




नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५१ * अंक २८० * | * अकोला * | रविवार, दिनांक ६ एप्रिल २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)







कॉफी हाऊस बिल्डिंग, गोकूळपेठ, नागपूर 2557429, 2542486

# महासागर पत्रकारांची अनुभव शाळा

## सेवानिवृत्त न्यायाधिश डागा यांच्याकडून कौतुकाची थाप : कर्मयोगी पुरस्काराचे थाटात वितरण





■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ५ :**
मानवाची महत्वकांक्षा ही त्याला पडलेले स्वप्न असून हे स्वप्न आपल्या कर्तुत्वातून सिद्ध करण्याची ताकद दैनिक महासागरचे मुख्य संपादक श्रीकृष्ण चांडक यांनी दाखवून दिली आहे तेव्हाच हे वृत्तपत्र आज ५५ वा वर्धापन दिवस साजरा करीत आहे. आर्थिक विवंचनेतून जात असताना श्रीकृष्ण चांडक यांच्याशी पक्षकार म्हणून झालेल्या भेटीत हा साक्षात्कार झाला. ५५ वर्षांच्या काळात अनेक पत्रकार येथून शिकून मोठे झाले आहेत व प्रदीप मैत्र, मोरेश्वर बडगे व शाम जुवेकर यांच्यासारखे कित्येक पत्रकार नावालौकिकास आलेले आहेत त्यामुळे दैनिक महासागर ही पत्रकारांची अनुभव शाळा आहे, असे प्रतिपादन महासागर कर्मयोगी पुरस्कार २०२५ या सोहळ्याचे अध्यक्ष कायदे पंडित सेवानिवृत्त न्यायमूर्ती विजय डागा यांनी केले.

दैनिक महासागरच्या ५५ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून महासागर कर्मयोगी पुरस्कार २०२५ या सोहळ्याचे आयोजन माहेश्वरी भवन येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून कायदे पंडित जस्टीस विजय डागा, वाघमारे मसाले उद्योगाचे मालक प्रकाश वाघमारे, आयकर विभागाचे सहआयुक्त संजय अग्रवाल, ॲड. सुरेश ढोले, दैनिक महासागरचे मुख्य संपादक श्रीकृष्ण चांडक उपस्थित होते.

टेकडी रोडवरील माहेश्वरी भवन येथे आयोजित या कार्यक्रमाला भरगच्च उपस्थिती होती. दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरूवात झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना महासागरचे मुख्य संपादक श्रीकृष्ण चांडक यांनी महासागरच्या खडतर प्रवासाचे वर्णन केले. ज्याला कष्ट करायचे आहे त्यांनी वृत्तपत्र चालवावे आणि जो सत्यनिष्ठा बाळगून मेहनत करण्याची तयारी ठेवतो तोच पत्रकार आहे बाकी पत्रावळीकर आहे. दैनिक महासागर च्या ५४ वर्षाच्या काळात अनेक अडचणींचा व कर्जबाजारीपणाचा सामना करावा लागला. एक वेळ अशी आली की घरचे सोने चांदी दागिने विकावे लागले. पण मी डगमगलो नाही. देवेंद्र फडणवीस यांनी वृत्तपत्राचे दर त्या काळाच्या तुलनेत अडीच पटीने वाढवून पत्रकारितेला सुवर्ण दिवस आणून दिले आणि आज जे चांगले दिवस पाहायला मिळत आहे त्याचे सर्व श्रेय मुख्यमंत्री फडणवीस यांना जाते, असे सांगत त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

श्रीकृष्ण चांडक, उमाशंकर लाल, पंकज चांडक, राहुल चांडक, विशाल चांडक, सरिता चांडक, ममता चांडक, प्रविण डबली, प्रभाकर दुपारे आदिंनी अतिथींचे स्वागत केले.

याप्रसंगी वैद्यकीय क्षेत्रातील महासागर कर्मयोगी पुरस्कार उपचार महर्षी पद्मश्री डॉ. विलास डांगरे, पत्रकारिता क्षेत्रातील पुरस्कार पत्रतपस्वी कमलाकर धारप, सेवाभावी संस्था म्हणून प्रगती राजस्थानी महिला मंडळ आणि तळागाळातील व्यक्तीच्या विकासासाठी झटणारे डॉक्टर हरीश धुरट यांना विजय डागा आणि प्रकाश वाघमारे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

आपल्या भाषणात विजय डागा पुढे म्हणाले की लोकशाहीसाठी आवश्यक असलेली पत्रकारितेतील पारदर्शकता, स्वतंत्रता सरकारी नियंत्रणांमुळे व खाजगी कंपन्यांची मालकी किंवा व्यक्तीचा ताबा यामुळे धोक्यात आलेली आहे.

सोशल मीडिया सारख्या तंत्रज्ञानाचा गैरवापर करून खोट्या बातम्या पसरविल्या जात आहे यावर अंकुश येणे गरजेचे आहे.

यावेळी बाळासाहेब ठाकरे, नरेंद्र मोदी, लता मंगेशकर, अटल बिहारी वाजपेयी यांच्यासारख्या गणमान्याना आपली होमिओपॅथी चिकित्सा देऊन बरे करणारे डॉक्टर विलास डांगरे म्हणाले की सत्य तत्वावर आधारित होमिओपॅथी चिकित्सा ही अजूनही उपेक्षित व विडंबित आहेत ही चिकित्सा तळागाळातील शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहोचवण्याचा माझा प्रयत्न आहे. समाजकारण व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या सानिध्यातून मला गोरगरिबांची सेवा करण्याची प्रेरणा मिळाली आणि ही सेवा ही अखंडपणे करीत आहे अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली. कष्टकरी कामगार व माथाडी कामगारांचे दैवत असणारे सामाजिक कार्यकर्ते हरीश धुरट हे म्हणाले की दारिद्रय रेषेवरील माणूस आपल्या डोक्याचा वापर हा विकास प्रक्रियेसाठी करीत असतो तर रेल्वे स्थानावरील कुली, भारवाहक , कष्टकरी कामगार हे आपल्या डोक्याचा वापर आपल्या पोटासाठी करत असतात.

50 किलो वजन असणारे व्यक्ती 100 ते 110 वजनी भार उचलून नेतात. या विरुद्ध लढा देऊन 1998 सांगली राष्ट्रपतींनी 50 किलो वजनी माणसाने 50 पेक्षा कमी वजन उचलण्याचा आदेश काढला तो 2011 पर्यंत अमलात येईपर्यंत आंदोलन करावे लागले.

यावेळी जेष्ठ पत्रकार कमलाकर धारप यांनी आपल्या पत्रकारितेतील 50 वर्षाचा प्रवास उलगडला तर सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक अशा सर्वच स्तरावर सामाजिक बांधिलकी बांधणाऱ्या प्रगती राजस्थान महिला मंडळ च्या अध्यक्ष सरला सोमानी यांनी महासागर वृत्तपत्राकडून या पुरस्कारासाठी आमची निवड करून आमच्या उत्कृष्ट कामाची पावती दिली आहे. त्याबद्दल आम्ही आभारी असल्याचे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले.

यावेळी मंचावर दैनिक महासागर चे सीईओ उमाशंकर लाल, प्रभाकर दुपारे, राहुल चांडक, पंकज चांडक, विशाल चांडक, प्रवीण डबली, कमल नामपल्लीवार व समस्त महासागर परिवार उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन रेखा दंडीगे घीया यांनी केले तर प्रवीण डबली यांनी आभार मानले. कार्यक्रमाला महासागरचे विदर्भातील जिल्हा प्रतिनिधी, वार्ताहर, प्रतिनिधी, नागपूर कार्यालयातील सर्व कर्मचारी तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

## महाराष्ट्रातील बड्या काँग्रेस नेत्यांवर
# कारवाई होण्याचे संकेत

### वक्फ भूखंड घोटाळ्यात हात असल्याचा आरोप

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ५ :**
वक्फ भूखंड घोटाळ्यात हात असणाऱ्या काँग्रेसच्या राज्यातील बड्या नेत्यांवर कठोर कारवाई करण्याचा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एका इंग्रजी वृत्तपत्राशी बोलताना दिला आहे. त्यांच्या या इशाऱ्यामुळे वेगवेगळ्या मुद्यांवरून महायुती सरकारला धारेवर धरणाऱ्या काँग्रेसच्या गोटात एकच खळबळ माजली आहे.



संसदेने वक्फ दुरुस्ती विधेयकावर आपली मोहोर उमटवली आहे. आता राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी या विधेयकावर स्वाक्षरी केल्यानंतर त्याचे कायद्यात रुपांतर होईल. हा कायदा अस्तित्वात आल्यानंतर महाराष्ट्रात मोठ्या घडामोडी घडण्याचे संकेत आहेत. तसे संकेत स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेत.

त्यांच्या मते, वक्फ कायदा अस्तित्वात आल्यानंतर वक्फ भूखंड घोटाळ्यात समावेश असणाऱ्या काँग्रेसच्या अनेक मोठ्या नेत्यांवर कारवाई केली जाईल.

देवेंद्र फडणवीस द हिंदू या इंग्रजी वृत्तपत्राशी बोलताना म्हणाले, महाराष्ट्रात 2000 ते 2014 या कालखंडात वक्फ भूखंड घोटाळा झाला. या घोटाळ्यातील काँग्रेसच्या राज्यातील अनेक नेत्यांचा हात असल्याचे निष्पन्न झाले. काँग्रेसने वक्फची बहुतांश जमीन बळकावली आहे. काँग्रेसच्या सर्वच बड्या नेत्यांची त्यात नावे होती. मी विधानसभेच्या पटलावरही हा मुद्दा मांडला होता. या प्रकरणाच्या चौकशीसाठी न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीने ही जमीन या नेत्यांनी बळकावल्याचा अहवाल दिला होता. आता आमचे सरकार या अहवालात नमूद नेत्यांवर योग्य ती कारवाई करेल.

यावेळी त्यांना या घोटाळ्यात सहभागी असलेल्या काँग्रेसच्या नेत्यांची नावे विचारली असता त्यांनी ती उघड करण्यास नकार दिला. मला या नेत्यांची नावे आठवत नाहीत, पण त्यात अनेक प्रमुख नेत्यांच्या नावांचा समावेश होता, असे ते म्हणाले.

फडणवीस पुढे म्हणाले, वक्फ दुरुस्ती विधेयकाचा हिंदुत्वाशी कोणताही संबंध नाही. हे विधेयक लोकशाहीवादी, समाजवादी प्रजासत्ताक भारताच्या घटनात्मक भावनेशी सुसंगत आहे. त्यामुळे समाजाच्या फायद्यासाठी हे विधेयक मंजूर करण्याचा निर्णय अत्यंत ऐतिहासिक आहे.

## दिवंगत अभिनेते मनोज कुमार यांच्यावर
# शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :**
अभिनेता-दिग्दर्शक मनोज कुमार यांच्यावर शनिवारी शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचे पार्थिव तिरंग्यात गुंडाळून मुंबईतील जुहू येथील पवनहंस स्मशानभूमीत आणण्यात आले. येथे त्यांना २१ तोफांची सलामी देण्यात आली.



त्यांचा मुलगा कुणाल गोस्वामी यांनी मुखाग्नी दिला. प्रेम चोप्रा, सलीम खान, सुभाष घई, अमिताभ बच्चन आणि अभिषेक बच्चन हे त्यांच्या अंत्यसंस्काराला उपस्थित होते.

मनोज कुमार यांचे शुक्रवारी निधन झाले. त्यांनी मुंबईतील कोकिलाबेन रुग्णालयात अखेरचा श्वास घेतला.

## मुस्लिम संघटनांकडून
# उद्धव ठाकरे यांचे कौतुक

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :**
मुस्लिम संघटनांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने वक्फ दुरुस्ती विधेयकाच्या विरोधात घेतलेल्या भूमिकेचे स्वागत केले आहे.

प्रस्तुत विधेयकाला विरोध करून उद्धव ठाकरे यांनी योग्य पाऊल उचलले आहे. कारण, या विधेयकाच्या अंमलबजावणीमुळे वक्फच्या जमिनीचा वापर इतर कामांसाठी होण्याची शक्यता आहे, असे त्यांनी म्हटले आहे. ठाकरे गटाने या विधेयकावरील मतदानावेळी विरोधात भूमिका घेतली. सरकार वक्फ बोर्डाची लाखो एकर जमीन उद्योगपतींच्या घशात घालण्याचा प्रयत्न करत आहे, अशी एकंदर भूमिका ठाकरे गटाने घेतली आहे.

# वाघाच्या हल्ल्यात युवा शेतकरी ठार

■ **महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि. ५ :**
मूल तालुक्यातील चितेगाव येथे शनिवारी सकाळी शेषराज पांडुरंग नागोशे (३८) या युवा शेतकऱ्यावर वाघाने हल्ला केला असता त्याचा घटनास्थळीच मृत्यू झाला. दोन दिवसात वाघाच्या हल्ल्यातील हा दुसरा बळी असून या वर्षात चार महिन्यात नऊ जणांचा बळी घेतला आहे.

वन विभागाने दिलेल्या माहितीनुसार, शेषराज हे त्यांच्या शेतातील भाजीपाला पिकाला पाणी देण्यासाठी गेले होते. उमा नदीच्या परिसरात असलेल्या त्यांच्या शेतात दबा धरून बसलेल्या वाघाने त्याच्यावर अचानक हल्ला केला. यात त्यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेची माहिती वन विभागाला देण्यात आली. त्यानंतर वन पथक घटनास्थळी दाखल झाले. यावेळी मृतदेहाचा पंचनामा करण्यात आला. या घटनेमुळे गावात भीती व दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे.







## ठाकरेंचे अनेक अस्वस्थ नेते शिंदेंच्या संपकार्त

**मुंबई :** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातील अनेक नेते अस्वस्थ असून ते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संपर्कात असल्याचा खळबळजनक दावा उद्योगमंत्री उदय सामंत यांनी केला आहे. ठाकरे गटाचे ज्येष्ठ नेते चंद्रकांत खैरे यांच्या नाराजीच्या संदर्भात पत्रकारांनी विचारले असता, सामंत यांनी हा दावा करत राजकीय वर्तुळात खळबळ उडवून दिली आहे. एकच नाराज नसतो, एकटेच कोणी अस्वस्थ नसतं, दोघे अस्वस्थ असू शकतात, असे सूचक वक्तव्य करत त्यांनी ठाकरे गटातील अंतर्गत अस्वस्थतेचा मुद्दा उपस्थित केला. सामंत यांनी पुढे सांगितले की, मी यापूर्वी पाच माजी आमदारांचा आकडा सांगितला होता, ते आता शिंदे गटात सामील झाले आहेत. आणखी सहा जण सध्या वेटिंग लिस्टवर आहेत. या दाव्याने ठाकरे गटाला मोठा धक्का बसण्याची शक्यता आहे. शिंदे गटाने गेल्या काही महिन्यांत ठाकरे गटातील अनेक नेत्यांना आपल्या बाजूने वळवले असून, आता आणखी काही नेते पक्षांतराच्या तयारीत असल्याचे संकेत सामंत यांनी दिले आहेत. "अनेक अस्वस्थ नेते आजही एकनाथ शिंदे यांच्या संपर्कात आहेत," असे त्यांनी ठामपणे नमूद केले.

या दाव्यामुळे ठाकरे गटातील अंतर्गत कलह पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. चंद्रकांत खैरे यांच्यासारख्या ज्येष्ठ नेत्यांच्या नाराजीच्या बातम्या यापूर्वीही समोर आल्या होत्या. आता सामंत यांच्या वक्तव्यानंतर ठाकरे गटाला आपल्या नेत्यांना एकत्र ठेवण्याचे आव्हान निर्माण झाले आहे. दुसरीकडे, शिंदे गट आपली ताकद वाढवण्यासाठी सातत्याने प्रयत्न करत असल्याचे दिसते. या घडामोडींमुळे महाराष्ट्राच्या राजकारणात नवे वळण येण्याची शक्यता आहे. ठाकरे गटाकडून यावर अद्याप अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही, पण सामंत यांच्या दाव्याने राजकीय तर्कवितर्कांना उधाण आले आहे.

## वक्फ बोर्ड विधेयक मुस्लिम बांधवांच्या हिताचे संरक्षण करणारे , हेमंत पाटील यांचा दावा

**पुणे, :** लोकशाहीचे सर्वोच्च मंदिर असलेल्या लोकसभेत तसेच वरिष्ठ सभागृह 'राज्यसभेत' वक्फ बोर्ड विधेयक मंजूर झाले आहे.राष्ट्रपतींच्या स्वाक्षरी नंतर विधेयकाचे कायद्यात रूपांतर होईल.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारतातील मुस्लिम बांधवांना 'नव उम्मेद' देणारे हे विधेयक त्यांच्या अधिकारांचे संरक्षण करणारे आहे, असे मत यानिमित्ताने इंडिया अगेन्स्ट करप्शनचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि ओबीसी नेते हेमंत पाटील यांनी शनिवारी व्यक्त केले आहे. मुस्लिम महिलांचे सक्षमीकरण तसेच सकल मुस्लिम समाजाच्या अधिकारांचे संरक्षण करण्याचा मुख्य उद्देश सरकारचा आहे.विरोधकांनी हे विधेयक मुस्लिम विरोधी असल्याचा अपप्रचार केला.परंतु, हे विधेयक गरीब, मागासलेले मुस्लिम बांधव आणि त्यांच्या परिवारांच्या विकासाचा मार्ग प्रशस्त आणि सुकर करणारे आहे, असे मत पाटील यांनी व्यक्त केले.यूनीफाईड वक्फ मॅनेजमेंट इम्पावरमेंट इफिशिएंशी ॲन्ड डेव्लपमेंट अर्थात 'उम्मीद' मुस्लिम बांधवांच्या विकासासाठी कटिबद्ध असलेले पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारच्या दुरदृष्टीचे प्रतीक आहे.

वैज्ञानिक संस्था असलेले वक्फ बोर्ड धर्मनिरपेक्ष असणे आवश्यक आहे. असे असतांनाही केंद्र सरकारने वक्फ बोडार्तील मुस्लिमेतर यांची संख्या मर्यादित ठेवली आहे.विधेयकासंबंधी भ्रामक माहितीचा प्रचार करीत विरोधकांनी मुस्लिम बांधवांना घाबरवण्याचे काम केले असल्याचा आरोप पाटील यांनी केला.मुस्लिम बांधवांचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर विश्वास तसेच प्रेम आहे. केवळ दुष्प्रचार करीत मुस्लिम बांधवांच्या मनात संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा दावा करीत अपप्रचाराला बळी न पाडण्याचे आवाहन पाटील यांनी केले आहे.

## मराठी भाषा संवर्धनासाठी राज ठाकरे आणि सरकार एकत्र

**मुंबई:** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे (मनसे) अध्यक्ष राज ठाकरे आणि राज्य सरकार यांची मराठी भाषेच्या संवर्धनाबाबत एकच भूमिका असल्याचे आज स्पष्ट झाले. राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी आज राज ठाकरे यांच्या मुंबईतील "शिवतीर्थ" या निवासस्थानी भेट घेतली. ही त्यांची राज ठाकरे यांच्याशी दुसरी भेट होती. या भेटीत मराठी भाषेच्या संवर्धनासाठी राज ठाकरे यांच्या अपेक्षा आणि सरकारच्या योजनांवर सविस्तर चर्चा झाली. उदय सामंत यांनी भेटीनंतर पत्रकारांशी बोलताना सांगितले, "आज मी राज ठाकरे यांना दुसजयांदा भेटलो. मराठी भाषेबाबत त्यांच्या अपेक्षा जाणून घेतल्या. आपल्याला बँकाही आवश्यक आहेत, पण मुद्दा आहे मराठीत बोलण्याचा. आम्ही चांगल्या बाबींसाठी बँकांसोबत आहोत." त्यांनी पुढे स्पष्ट केले की, मराठी भाषेच्या संवर्धनासाठी सरकार आणि राज ठाकरे यांची दृष्टी एकच आहे. याच संदर्भात लवकरच जिल्हाधिकारी आणि जिल्हा पोलिस अधीक्षक यांची संयुक्त बैठक आयोजित करण्यात येणार आहे. मराठी भाषा संवर्धनासाठी सरकारने एक समिती स्थापन केली असून, तिचे नेतृत्व जिल्हाधिकारी करणार आहेत. या समितीत जिल्हा पोलिस अधीक्षकांचाही समावेश असेल. या समितीमार्फत मराठी भाषेचा वापर वाढवण्यासाठी ठोस पावले उचलली जाणार आहेत. उदय सामंत म्हणाले, "राज ठाकरे आणि सरकारची भूमिका स्पष्ट आहे की, मराठी भाषेला प्राधान्य मिळायलाच हवे. यासाठी प्रशासकीय स्तरावरही प्रयत्न केले जातील. ही भेट राजकीय वतुर्ळात चर्चेचा विषय ठरली आहे. मराठी भाषेच्या मुद्द्यावरून राज ठाकरे यांनी नेहमीच आक्रमक भूमिका घेतली आहे. आता सरकारसोबत त्यांच्या विचारांची सांगड घातली जाणार असल्याने मराठी संवर्धनाला नवे बळ मिळण्याची शक्यता आहे. या भेटीतून राजकीय समीकरणे बदलतील की नाही, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

## आता महायुती सरकारमध्ये अजित पवारांपेक्षा शिंदे भारी



**■ महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई, दि. ५ :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना नव्या प्रशासकीय प्रक्रियेत अजित पवारांच्या वरचे स्थान देण्यात आले आहे. राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी मंगळवारी जारी केलेल्या आदेशानुसार, सर्व विभागांच्या फायली आता अजित पवारांकडून आधी एकनाथ शिंदेंकडे जातील. त्यांच्या मंजुरीनंतरच त्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांकडे पाठवण्यात येतील. महायुती सरकारमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यानंतर क्रमांक १ आणि क्रमांक २ चे उपमुख्यमंत्री कोण, अशी चर्चा राजकीय वतुर्ळात रंगली होती. या निर्णयामुळे शिंदेच नंबर एकचे उपमुख्यमंत्री असून अजित पवारांपेक्षा शिंदे भारी असे स्पष्ट झाले आहे. शिंदे मुख्यमंत्री असताना धोरणात्मक निर्णयांच्या फायली तेव्हाचे उपमुख्यमंत्री फडणवीसांकडून शिंदेंकडे जात होत्या. त्यामुळे प्रत्येक निर्णयात फडणवीसांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरत होती. आतापर्यंत अजित पवारांकडे अर्थ खाते असल्याने सर्वच फायली त्यांच्यामार्फत फडणवीसांकडे जात होत्या. शिंदेंकडे फायली जात नसल्याने त्यांच्याकडे फारसे अधिकार नसल्याची चर्चा रंगली होती. तसेच दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या अधिकारांबाबत स्पष्टता नव्हती. अजित पवार यांना पाठबळ देऊन शिंदेंचे वर्चस्व कमी केल्याचेही म्हटले जात होते. मुंबईसह इतर महापालिका तसेच जिल्हा परिषदांच्या आगामी निवडणुकीत शिंदेंच्या नाराजीचा फटका भाजपला बसू शकतो, असे म्हटले जाऊ लागले. त्यामुळे फडणवीसांनी शिंदेंना नंबर १ उपमुख्यमंत्री करत विशेष अधिकार दिला आहे, असे सूत्रांनी सांगितले.

दिल्लीश्वरांचा संदेश : शिंदेच भाजपसाठी जास्त महत्त्वाचे

मुख्यमंत्रिपद, गृह खाते, पालकमंत्रिपद, बंगले वाटपावरून शिंदे नाराज आहेतच. दुसरीकडे आपण भाजपच्या हिंदुत्ववादी भूमिकेच्या विरोधात आहोत, असे अजित पवार वारंवार दाखवून देत आहेत. अशा स्थितीत मनपा निवडणुकीत शिंदेंची नाराजी परवडणारी नाही, असे दिल्लीश्वरांच्या लक्षात आले. त्यांच्या फमार्नावरून शिंदेच नंबर १ उपमुख्यमंत्री असल्याचे फडणवीसांनी या निर्णयातून स्पष्ट केले. शिंदे-फडणवीसांतील कोल्डवॉर थंडावण्याचा हा एक प्रयत्न असल्याचे असे सूत्रांचे म्हणणे आहे.

## कुठल्याही मंत्र्यांनी शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळू नये

### माणिकराव कोकाटेंच्या वक्तव्याबद्दल माफी मागू: बावनकुळे




**■ महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई, दि. ५ :** कुठल्याही मंत्र्यांनी शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळू नये. शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. त्याची भरपाई देणं ही सरकारची जबाबदारी आहे, खरंतर कोकाटे काय बोलले हे मला माहिती नाही, असे भाजपचे प्रदेशाध्यक्ष तथा मंत्री चंद्रेशखर बावनकुळे यांनी म्हटले आहे. चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे आहे. शेतकऱ्यांच्या नुकसानाचे पंचनामे करत एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहू दिला जाणार नाही. आम्ही आमची जबाबदारी पार पाडू. कोकाटेंनी काही म्हटले असेल तर सरकार म्हणून आम्ही शेतकऱ्यांची माफी मागू. उबाठाला विचारण्याची गरज नाही. चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, आम्हाला उबाठाच्या लोकांना विचारणा करण्याची गरज नाही, आमच्याकडे स्पष्ट बहुमत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सरकार हे बहुमताचे सरकार आहे, आम्हाला काय गरज आहे उबाठाकडे जायची, असा सवाल बावनकुळेंनी उपस्थित केला आहे. चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, मंगळवारी उद्धव ठाकरेंच्या गटातील अनेक जण पक्ष सोडत आहे.

## गुन्हे सिद्ध करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर होणार

**■ महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई, दि. ५ :** भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, भारतीय न्याय संहिता आणि भारतीय पुरावा कायदा या तीन नवीन फौजदारी कायद्यांच्या अंमलबजावणीतून गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवण्यासाठी राज्यात आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केला जाणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. यासाठी पोलिस अधिकाऱ्यांना प्रशिक्षणासोबतच टॅबदेखील वितरित करण्यात येणार आहेत. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, नव्या कायद्यांची अंमलबजावणी करताना पोलिस अधिकाऱ्यांना संपूर्ण प्रशिक्षण दिले जावे आणि त्यासाठी 'रिफ्रेश कोर्सेस' सुरू करावेत. या कायद्यांमध्ये फॉरेन्सिक तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करून गुन्हे सिद्ध करण्यावर भर दिला गेला असून त्यामुळे राज्यातील गुन्हे सिद्धतेचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. न्यायवैद्यक (फॉरेन्सिक) पुरावे गोळा करण्यासाठी वैद्यकीय महाविद्यालये, रुग्णालये येथे प्रयोगशाळा सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. तसेच, सीसीटीएनएस २.०. प्रणालीमध्ये "बँडविड्थ" क्षमता वाढवण्यावर भर दिला जाणार आहे, जेणेकरून देशपातळीवरच्या गुन्ह्यांच्या तपासामध्ये सुसूत्रता आणि परिणामकारकता वाढेल.

राज्यात सात वर्षांपेक्षा जास्त शिक्षा असलेल्या गुन्ह्यांमध्ये न्यायवैद्यक पुरावे अनिवार्य करण्यात आले असून सध्या अशा प्रकरणांमध्ये राज्याचे योगदान ६५ टक्के आहे. याशिवाय, सात वर्षांपेक्षा कमी शिक्षेच्या प्रकरणांतही फॉरेन्सिक पुराव्यांचा वापर वाढवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तपास अधिकाऱ्यांना आवश्यक साधनसामग्री पुरवण्यासाठी टॅब खरेदीची प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी, असेही फडणवीस यांनी सांगितले. न्यायालयीन प्रक्रियेला गती देण्यासाठी "ई-समन्स" व "ई-साक्ष" यासारखे उपक्रम न्यायालयाच्या परवानगीने राबवण्याचे सूचित करत, कारागृहांतील कैद्यांसाठी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून संवाद सुविधा वाढवण्याचेही आदेश देण्यात आले. याशिवाय, "ई-कोर्ट"साठी आवश्यक पडताळणी करण्याचे निर्देशही त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

## कन्फर्म तिकीटासाठी रेल्वे अधिकाऱ्यांच्या बनावट सहीशिक्यांचा वापर

**■ महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई, दि. ५ :** रेल्वेने प्रवास करायचा म्हटले की हमखास तिकीट मिळत नाही हा शब्द आपल्या कानावर येतो. पण मुंबईतील एक चहावाला व्हीआयपी कोट्यातून तिकीट कन्फर्म करत असल्याचा प्रकार समोर आला आहे.

रेल्वे अधिकाऱ्यांना चहा देणाऱ्या व्यक्तीने अधिकाऱ्यांच्या बनावट सही-शिक्क्यांचा वापर करत हे गैरकृत्य केले आहे. रविंद्र कुमार साहू असे चहावाल्याचे नाव आहे. तो सीएसएमटी रेल्वे कँटिनमध्ये कार्यरत आहे. दक्षता विभागाच्या निरीक्षकांनी त्याला ताब्यात घेतले असून त्याच्यावर कारवाई सुरू झाली आहे.

**कमवत होता दीड लाख रुपये महिना**

मिळालेल्या माहितीनुसार, रवींद्र साहूने वरिष्ठ विभागीय वित्त




व्यवस्थापक, मुख्य वैद्यकीय अधीक्षक आणि मुख्य अभियंता अशा पदांवरील अधिकाऱ्यांचे सही-शिक्का बनावट तयार करून घेतले. प्रतीक्षा यादीतील तिकीट कन्फर्म करण्यासाठीच्या विनंती पत्रावर याचा वापर करून संबंधित तिकिटे तो कन्फर्म करून घेत होता. हा चहावाला व्हीआयपी कोटा वापरून महिन्याकाठी दीड ते दोन लाखांची कमाई करत होता.

**असा उघड झाला प्रकार**

रेल्वे सुरक्षा दलाने कारवाई सुरू केली आहे. त्याचबरोबर माता रमाबाई आंबेडकर मार्ग पोलिस ठाण्यात व्हीआयपी कोट्याचा गैरवापर करत रेल्वेची फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया रेल्वे प्रशासनाने सुरू केली. मध्य रेल्वेचे मुख्य दक्षता निरीक्षक आणि त्यांचे पथक रेल्वेतील प्रवाशांची तिकीटे तपासत होते. त्यावेळी काही प्रवाशांनी जास्त पैसे देऊन कन्फर्म तिकीट घेतले आहे असे सांगितले. जेव्हा अधिक चौकशी केली तेव्हा रेल्वे कँटिनचा कामगारच व्हीआयपी कोट्यातून तिकीटे विक्रीचा कारभार करत होता असे उघडकीस आले.

## संजय राऊत यांना मेंटल हॉस्पिटलमध्ये 'बेड' बुक करु

**■ महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई, दि. ५ :** भांडूपचा भोंगा म्हणून अप्रत्यक्ष उल्लेख करत शिवसेना नेते संजय राऊत यांच्यावर राष्ट्रवादी काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते आनंद परांजपे यांनी सडकून टीका केली आहे. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व राष्ट्रीय कार्याध्यक्ष खासदार प्रफुल पटेल यांच्यावर टीका करताना भान न राखल्यास, भविष्यात ठाण्याच्या मेंटल हॉस्पिटलमध्ये एक बेड बुक करू, असा इशारा परांजपे यांनी दिला. गुरुवारी संसदेत खासदार प्रफुल पटेल यांनी वक्फ बोर्ड सुधारणा विधेयकावर भाष्य करत शिवसेनेच्या मूळ हिंदुत्वाचा उल्लेख केला होता. त्यांनी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या 'गर्व से कहो हम हिंदू हैं' या घोषणेला उजाळा दिला आणि४२-४३-मधील घटनांची आठवण करून दिली. यामुळे संजय राऊत अस्वस्थ झाले असून त्यांनी दिल्लीहून कर्कश आणि असंवेदनशील प्रतिक्रिया दिल्याचा आरोप परांजपे यांनी केला. बाळासाहेबांच्या काळातील शिवसेना आणि आताची संजय राऊत यांची शिवसेना यात जमीनअस्मानाचा फरक आहे, असे सांगत परांजपे यांनी शिवसेनेवर तीव्र टीका केली. त्यांनी सांगितले की, जे शब्द राऊत वापरतात, तेच जर आम्ही वापरले, तर आम्हालाही संजय राऊत यांना 'काँग्रेसचे सर्टिफाईड..." किंवा "सिल्व्हर ओकचे सर्टिफाईड... असे म्हणता येईल. पण आमच्यावर तसे संस्कार नाहीत. राज्यसभा आणि लोकसभेतील शिवसेनेच्या वागणुकीवर निशाणा साधताना परांजपे म्हणाले की, शिवसेना सध्या गोंधळलेल्या मानसिकतेतून बोलत आहे. पक्षातून सातत्याने लोक बाहेर पडत आहेत, त्यामुळे उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वावरचा विश्वास ढासळत आहे.

याचा विचार राऊत यांनी करायला हवा. पत्राचाळ घोटाळ्याचा संदर्भ देत परांजपे म्हणाले की, संजय राऊत यांनी आठ ते नऊ महिने ईडीच्या कोठडीत घालवले आहेत. सध्या ते जामिनावर आहेत. त्यांच्या आरोपांना गांभीर्य नाही. उलट प्रफुल पटेल यांच्यावर कोणतीही चौकशीसुद्धा लागलेली नाही.

## तिन्ही तुकडे एकाच चाकूचे:फॉरेन्सिक अहवाल उघड



**■ महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई, दि. ५ :** अभिनेता सैफ अली खानवरील हल्ल्यातील आरोपी शरीफुल इस्लामच्या जामीन अर्जावर शुक्रवारी मुंबई न्यायालयात सुनावणी झाली. दरम्यान, या प्रकरणाचा तपास करणाऱ्या मुंबई पोलिसांनी फॉरेन्सिक सायन्स लॅबच्या अहवालात मोठा खुलासा केला आहे. पोलिसांनी न्यायालयाला सांगितले की, आरोपींकडून जप्त केलेला चाकूचा तुकडा, गुन्ह्याच्या ठिकाणी सापडलेला तुकडा आणि सैफच्या मणक्यातून काढलेला तुकडा, हे तिन्ही एकाच चाकूचे आहेत. पोलिसांनी सांगितले की- आरोपींविरुद्ध भक्कम पुरावे सापडले आहेत. लवकरच आरोपपत्र दाखल केले जाईल. त्यांनी असेही सांगितले की, आरोपी इस्लाम हा बांगलादेशी नागरिक आहे आणि तो भारतात बेकायदेशीरपणे राहत होता. जर त्याला जामीन मिळाला तर तो बांगलादेशात पळून जाऊ शकतो. आरोपींनी दाखल केलेल्या जामीन अर्जात असे म्हटले होते की, एफआयआर खोटा आहे आणि तपास पूर्ण झाला आहे, फक्त आरोपपत्र दाखल करणे बाकी आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी ९ एप्रिल रोजी होईल. खरंतर, सैफ अली खान वर १५ जानेवारी रोजी त्याच्या सद्गुरु शरण अपार्टमेंटमधील घरात हल्ला झाला होता. यानंतर सैफ स्वतः रुग्णालयात पोहोचला. त्याच्या हाताला, पाठीला आणि पाठीला दुखापत झाली. उपचारानंतर, अभिनेत्याला २१ जानेवारी रोजी डिस्चार्ज देण्यात आला. या प्रकरणाचा तपास करत असताना, पोलिसांनी दोन दिवसांनी बांगलादेशी नागरिक शरीफुल इस्लामला अटक केली होती.

## प्रेक्षकांमध्ये देशभक्ती रूजवणारा कलाकार

**हिंदी** चित्रपट सृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते मनोज कुमार यांचे वयाच्या ८७ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने मनोरंजन विश्वात एकच हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. मनोज कुमार यांचा जन्म २४ जुलै १४३७रोजी रोजी झाला. मनोज कुमार यांचे खरे नाव हरिकिशन गिरी स्वामी असे होते. मनोज कुमार यांना लहानपणापासूनच अभिनयाची आवड होती. दिलीप कुमार हे त्यांचे आवडते अभिनेते. त्यांच्यावर दिलीप कुमार यांचाच प्रभाव होता. त्यांनी मनोज कुमार हे नाव धारण करण्यामागेही दिलीप कुमार हेच होते. शबनम या चित्रपटात दिलीप कुमार यांनी साकारलेल्या पात्राचे नाव मनोज कुमार असे होते. या चित्रपटात दिलीप कुमार यांनी साकारलेले मनोज कुमार हे पात्र त्यांना इतके भावले की त्यांनी स्वतःचे नाव मनोज कुमार असेच ठेवले. साली शहीद या चित्रपटाद्वारे मनोज कुमार यांनी हिंदी चित्रपट सृष्टीत पदार्पण केले. हा चित्रपट खूप गाजला. या चित्रपटात त्यांनी साकारलेली भगतसिंग यांची भूमिका प्रेक्षकांना खूप भावली. देशभक्तीवर आधारित हा चित्रपट यशस्वी झाल्याने त्यांनी पुढे अनेक देशभक्तीपर चित्रपटांची निर्मिती केली. मनोज कुमार यांनी उपकार या देशभक्तीपर चित्रपटाची निर्मिती आणि दिग्दर्शन केले. लाल बहादूर शास्त्री यांनी दिलेला जय जवान किसान... हा नारा त्यांनी या चित्रपटाद्वारे प्रेक्षकांपर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न केला. हा चित्रपट खूप गाजला या चित्रपटातील गाणी लोकप्रिय झाली. मेरे देश की धरती.... हे अजरामर गीत याच चित्रपटातले. उपकार नंतर त्यांनी पुरब और पश्चिम, हरियाली और रास्ता, रोटी कपडा और मकान, क्रांती, हिमालय की गोद मे हे देशभक्तीपर चित्रपट काढले हे सर्व चित्रपट खूप गाजले. या चित्रपटाद्वारे त्यांनी प्रेक्षकांमध्ये देशभक्ती रुजविण्याचा प्रयत्न केला. मनोज कुमार यांनी आणि अनेक देशभक्तीपर चित्रपटांची निर्मिती केली म्हणून त्यांना भारत कुमार हे टोपण नाव पडले. त्यांनी निर्माण केलेले आणि अभिनय केलेले देशभक्तीवरील चित्रपट त्याकाळी खूप गाजले होते. मेरे देश की धरती, सरफरोशी की तमन्ना, एक प्यार का नगमा है, पाणी रे पाणी तेरा रंग कैसा अशी अनेक अजरामर गाणी मनोज कुमार यांच्यावर चित्रित झाली आहेत. आजही स्वातंत्र्य दिनी आणि प्रजासत्ताक दिनी त्यांच्या देशभक्तीवरील चित्रपटातील गाणी आवर्जून वाजवली जातात. शोर, पत्थर के सनम, दो बदन, मेरा नाम जोकर हे त्यांनी अभिनय केलेले चित्रपट देखील खूप लोकप्रिय ठरले. मनोज कुमार यांना त्यांच्या अभिनयासाठी अनेक पुरस्कार मिळाले. उपकार या चित्रपटासाठी त्यांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. साली त्यांना चित्रपट सृष्टीतील सर्वोच्च असा दादासाहेब फाळके पुरस्कार मिळाला. १४४२ साली भारत सरकारने त्यांना पद्मश्री हा मानाचा पुरस्कार देऊन गौरविले. मनोज कुमार यांनी चित्रपटाद्वारे प्रेक्षकांमध्ये देशभक्ती रुजविण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या निधनाने प्रेक्षकांमध्ये देशभक्ती रुजवणारा पडद्यावरील भारत कुमार काळाच्या पडद्याआड गेला असे म्हणावे लागेल. मनोज कुमार यांच्या निधनाने हिंदी चित्रपट सृष्टीची मोठी हानी झाली आहे. ज्येष्ठ अभिनेते मनोज कुमार यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**४४२२५४६२४५४४**

## बँकांत जाऊन मराठी भाषेचा आग्रह धरण्याचे आंदोलन थांबवा

**मुंबई, दि. ५ :** गेल्या काही दिवसांपासून मराठी भाषेसंदर्भात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने राज्यात सुरु असलेले आंदोलन अखेर थांबवणार आहे. या संदर्भात मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी मनसैनिकांना एक पत्र लिहिले आहे. या पत्रात आपण पुरेशी जागृती केली असल्याचा उल्लेख करण्यात आला आहे. विशेष म्हणजे आजच राज ठाकरे यांची मंत्री उदय सामंत यांनी भेट घेतली होती. त्यानंतर राज ठाकरे यांनी हे पत्र लिहिले आहे.

## मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रम जाहीर

**मुंबई, दि. ५ :** राज्यातील तरुणांना प्रशासनासोबत काम करण्याचा अनुभव मिळावा व त्या सोबतच त्यांच्या ज्ञानाच्या, अनुभवाच्या कक्षा रुंदावण्यात मदत व्हावी. तरुणांमधील कल्पकता व वेगळा विचार मांडण्याची क्षमता, उत्साह, तंत्रज्ञानाची आवड यांचा उपयोग प्रशासनास व्हावा आणि या माध्यमातून प्रशासकीय प्रक्रियांमध्ये गतिमानता यावी यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतील मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रम २०२५-२६-जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार या कार्यक्रमात ६० फेलोंची निवड करण्यात येणार आहे.

## अजित पवारांनी वक्फ सुधारणा विधेयकाला दिलेला पाठिंबा

**■ महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई, दि. ५ :** सत्तेसाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांनी धर्मनिरपेक्षतेचा बुरखा फाडून टाकला असून, त्यांनी मुस्लीम समाजाच्या विश्वासाला तडा दिला आहे," असा घणाघाती आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे. भाजपा सरकारच्या वक्फ सुधारणा विधेयकाला पाठिंबा देऊन अजित पवार यांनी सत्ता टिकवण्यासाठी भाजपापुढे लोटांगण घातल्याची टीका त्यांनी केली. पत्रकारांशी संवाद साधताना सपकाळ म्हणाले, अजित पवार सातत्याने आपण शिव, शाहू, फुले, आंबेडकरांच्या विचारांचा वारसा चालवतो, असे सांगत असले तरी प्रत्यक्षात मात्र त्यांनी पुरोगामी विचारधारेचा पूर्णतः विसर पाडला आहे. त्यांनी काका शरद पवार यांचा पक्ष चोरून घेतला, त्याचे नाव व चिन्हही हडपले आणि आता सत्तेसाठी भाजपाच्या धमार्धार्मिक अजेंडाला पाठिंबा देत आहेत. सपकाळ यांनी पुढे सांगितले की, अलीकडेच एका इफ्तार पार्टीत अजित पवार यांनी मुस्लीम समाजाच्या पाठीशी असल्याचे सांगितले होते. त्यांनी मुस्लीम समाजाविरोधात कार्य करणाजयांना माफ केले जाणार नाही, असे ठामपणे सांगितले. मात्र चार दिवस उलटण्याआधीच त्यांनी भाजपाच्या वक्फ सुधारणा विधेयकाला पाठिंबा देऊन मुस्लीम समाजाच्या पाठीत खंजीर खुपसला आहे.

काँग्रेसच्या मते, वक्फ सुधारणा विधेयक हे केवळ मुस्लीम समाजात दहशत निर्माण करण्याचा एक प्रयत्न आहे. या विधेयकाच्या माध्यमातून लाखो एकर वक्फ जमिनींवर सरकार ताबा मिळवू पाहत आहे. सपकाळ यांनी गंभीर आरोप करत सांगितले की, "धारावीसारख्या महत्वाच्या जमिनी एका विशिष्ट उद्योगपतीला देण्याचा डाव सरकारने आखला आहे. हे सर्व अजित पवार यांना माहित असूनही त्यांनी खुर्चीच्या मोहात विधेयकाला पाठिंबा दिला.

ही बाब मुस्लीम समाजासोबतच संपूर्ण समाजासाठी धोकादायक आहे. अजित पवारांचे खायचे आणि दाखवायचे दात वेगळे आहेत. त्यांनी केलेल्या या विश्वासघाताची जनतेने नोंद घ्यावी आणि सावध रहावे," असा स्पष्ट इशाराही काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिला. ही टीका अजित पवारांच्या राजकीय भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारी असून, आगामी काळात राज्यातील राजकारणात मोठी खळबळ उडवण्याची शक्यता आहे.

## भोईवाडा गाव पुनर्विकासाला गती देण्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निर्देश

**मुंबई :** मुंबईतील भोईवाडा गाव पुनर्विकास प्रकल्पाला तातडीने गती देण्यात यावी, तसेच मोडकळीस आलेल्या धोकादायक इमारतींमध्ये राहणाऱ्या रहिवाशांसाठी सुरक्षित पयार्यी व्यवस्था उपलब्ध करून द्यावी, असे स्पष्ट निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत.

या पार्श्वभूमीवर सह्याद्री अतिथीगृह येथे उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली एक महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीला उपमुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव असीम गुप्ता, मुंबई महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त बिपीन शर्मा, तसेच भोईवाडा पुनर्विकास सहकारी गृहनिर्माण सोसायटीचे पदाधिकारी उपस्थित होते. भोईवाडा गावचा पुनर्विकास गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेला असून स्थानिक रहिवाशांनी याबाबत वेळोवेळी मागणी केली आहे. मात्र प्रत्यक्षात कामाला गती मिळालेली नाही. या प्रकल्पाला आता चालना देण्यासाठी उपमुख्यमंत्री शिंदे यांनी विकासकाला एक संधी देण्याचे निर्देश दिले आहेत. याठिकाणी काही रहिवाशी अत्यंत धोकादायक इमारतींमध्ये राहात असल्याने त्यांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून महापालिकेने विशेष बाब म्हणून तातडीने पयार्यी निवासाची व्यवस्था करावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## दूषित पाण्यामुळे दोन शाळकरी मुलींचा दुर्दैवी मृत्यू

**■ महासागर प्रतिनिधी,**
**सोलापूर , दि. ५ :** सोलापूरच्या बाबासाहेब जगजीवन राम झोपडपट्टीत, दूषित पाण्याच्या संशयामुळे दोन शाळकरी मुलींचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे तर एका मुलीची प्रकृती गंभीर आहे.

पीडित कुटुंबांनी आरोप केला आहे की, त्यांच्या घरी पुरवठा होणारे दूषित पाणी पिऊन मुली आजारी पडल्या. स्थानिक रहिवाशांनी परिसरातील पाणीपुरवठ्याच्या गुणवत्तेबद्दल चिंता व्यक्त केली आहे. या प्रकरणी आता सोलापूर कर चांगलेच आक्रमक झाले असून पीडित कुटुंबाला न्याय देण्यासाठी आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

वास्तविक सोलापूरला सतत पाणी दूषित होण्याच्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळे या प्रकरणाकडे गांभीर्याने पाहिले जात आहे.दोन मुलींच्या मृत्यूमुळे आता सोलापूर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. भाग्यश्री म्हेत्रे, वय १६ वर्षे आणि जिया म्हेत्रे, वय १६ वर्षे असे या मृत मुलींची नावे आहेत. सोलापूर मध्ये होणारे दुषित पाणी पुरवठ्यामुळे त्या आजारी पडल्या असल्याचा आरोप केला जातोय.



तर जयश्री महादेव म्हेत्रे, वय अठरा वर्षे, ही मुलगी सध्या गंभीर असून रुग्णालयात तिच्यावर उपचार सुरू आहेत. कर्मचाऱ्यांवर कारवाई होणार असल्याचे महानगरपालिका आयुक्तांचे आश्वासन या झोपडपट्टीमध्ये मागील काही दिवसांपासून दूषित पाणीपुरवठा होत असल्याचा स्थानिकांचा आरोप आहे. भारतीय जनता पक्षाचे आमदार देवेंद्र कोठे यांनी देखील दूषित पाणीपुरवठा होत असल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला आहे. महानगरपालिकेच्या याच हलगर्जीपणामुळे या मुलींचा मृत्यू झाला असल्याचा आरोप देखील आता केला जात आहे. त्यामुळे आता अशा कर्मचाऱ्यांवर कारवाई होणार असल्याचे आश्वासन महानगरपालिका आयुक्तांनी दिले आहे.

# रामनवमी शोभायात्रेत लाखोंच्या संख्येने सहभागी व्हा!

**▪अकोला,दि ५ (प्रतिनिधी):**
स्व.आ गोवर्धन शर्मा प्रणित विहीप -राम नवमी शोभायात्रा समितीच्या वतीनेआज रविवार दिनांक ६ एप्रिल रोजी रामनवमी शोभायात्रेचे महानगरात भव्य आयोजन होत असून यात महानगरातील ५१ विविध मंडळ,संस्था, संघटनांच्या श्रीरामाच्या झाक्या व देखावे सहभागी होणार आहेत.या शोभायात्रेत धर्म ध्वजासह ११ घोडेस्वार सहभागी होणार आहे. यात बाल शिवाजी, जिजामाता, महाराणा प्रताप, अहिल्याबाई होळकर, झाशीची राणी लक्ष्मीबाई, राणी ताराबाई, छत्रपती संभाजी महाराज व अन्य महापुरुषांचे घोड्यांवर झाकी सादर करण्यात येणार आहे. तसेच श्रीराम पादुका सह विहिपचा मानाचा श्रीराम दरबार राहणार आहे. धार्मिक तत्त्वावर ५१ विविध धार्मिक झाक्या देखावे सह ५० महिला दिंडी मंडळ, १० पुरुष वारकरी दिंडी मंडळ, ढोल पथक आदींचा समावेश राहणार आहे.



विहीप रामनवमी शोभायात्रा समितीच्या वतीने आज मोठ्या राम मंदिरात सकाळी ८ वाजता भगवान श्रीरामाचे पादुका पूजन ,अभिषेक सोहळा होणार असून यानंतर सकाळी ११-३० वाजता जुन्या शहरातील विठ्ठल मंदिरात मातृशक्तींच्या वतीने राम जन्मोत्सव साजरा करण्यात येणार आहे. यानंतर दुपारी ४-४५ वाजता राज राजेश्वर मंदिरापासून भव्य शोभायात्रा निघणार आहे. या शोभायात्रेत प्रमुख पाहुणे म्हणून जिल्ह्याचे पालकमंत्री ना आकाश फुंडकर समवेत समस्त लोकप्रतिनिधी,जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक,विहिप रामनवमी शोभायात्रा समितीचे पदाधिकारी आदींची उपस्थिती राहणार आहे.ही शोभायात्रा जयहिंद चौक, सिटी कोतवाली, टिळक रोड, जुने कापड बाजार, जैन मंदिर, गांधी चौक मार्गे या शोभा यात्रेचे सिटी कोतवाली चौकात मोठ्या भक्ती भावात समापन होणार आहे.या शोभायात्रेत समस्त रामभक्त महिला पुरुषांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन श्रीमती गंगादेवी शर्मा,अशोक गुप्ता,वसंत बाछूका, विहीप रामनवमी शोभायात्रा समितीचे सर्वसेवा धिकारी कृष्णा गोवर्धन शर्मा, श्रीरामनवमी शोभायात्रा समितीचे अध्यक्ष शैलेंद्र उर्फ्र बंटी कागलीवाल, विहिपचे अध्यक्ष प्रकाश लोढिया, समितीचे कोषाध्यक्ष राहुल राठी, विहिपचे प्रांत सहमंत्री गणेश काळकर, बजरंग दल प्रांत सहसंयोजक सुरज भगेवार, प्रकाश घोगलिया,समितीचे माजी अध्यक्ष विलास अनासने, रामप्रकाश मिश्रा, ब्रिजमोहन चितलांगे, डॉ.अभय जैन,शैलेश खरोटे,हरिओम पांडे,संजय दुबे, निलेश पाठक,अमर कुकरेजा, राजु मंजुळकर, सिद्धार्थ शर्मा,नविन गुप्ता, मनीष बाछूका,संदिप निकम, संदीप वाणी, रोशन जैन, विजय डहाके, प्रताप विरवाणी, आकाश ठाकरे, नितीन जोशी,पंडित हेमंत शर्मा,बाळ बिडवाई,अरुण शर्मा, डॉ प्रियश शर्मा, सुमित शर्मा, प्रा अनुप शर्मा, शंकर खोवाल,संतोष बुरडे, निलेश नागोसे,राधेश्याम शर्मा, मनोज कस्तुरकर, संतोष पांडे, विकी ठाकूर,सुनील कोराडिया, महेंद्र खंदेडिया,रितेश चौधरी,अक्षद कागलीवाल,पवन ठाकूर,रोहित ठाकूर, गुरुचरण ठाकूर,सतपाल ठाकूर,बाबू बागडे, उपस्थित होते.

# अकोट फाईल पुलावर दररोज जॅम!

## रोजच्या त्रासाला नागरिक कंटाळे

**▪अकोला,दि ५ (प्रतिनिधी):**
अकोट फाईल रेल्वेपुलावर पुलावर नागरिकांसाठी रोजची डोकेदुखी झाली आहे. असा एकही दिवस जात नाही की ज्या दिवशी या पुलावर वाहतूक जॅम झाली नाही. अकोट अचलपूर मार्गे बैतुल कडे जाणारी वाहने या मार्गाने जात असतात. दररोज हजारो वाहने या पुलावरून ये जा करीत असतात. अगदी रात्री उशिरापर्यंत हा पुल वाहत असतो. परंतु वाहनांची गर्दी या ठिकाणी मोठ्या प्रमाणात होते. त्यामुळे जॅम लागतो. वाहतूक शिपाई देखील राहत नाही. त्यामुळे नागरिकांची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे. याकडे तातडीने लक्ष देण्याची गरज



आहे असे शहरातील नागरिकांचे म्हणणे आहे. मध्यंतरी न्यू तापडिया नगर रस्ता रेल्वे गेटचे काम सुरू असल्यामुळे वाहतूक बंद ठेवण्यात आली होती. त्यामुळे त्या भागातील वाहतूकही अकोट फाईल मार्गे सुरु होती त्यादरम्यानही नागरिकांना बराच त्रास सहन करावा लागला याकडे लक्ष देणे आवश्यक आहे कारण ही समस्या दिवसेंदिवस गंभीर रूप धारण करीत आहे नागरिकांची ओरड होत असली तरी चातडीने उपाययोजना केल्या जात नाही अशी समस्या निर्माण झाली आहेसकाळी तसेच सायंकाळी यापुलावर वाहतूक बरीच असते. त्यामुळे जायला रस्ता राहत नाही.

# शहरातील सिग्नल बंद; वाहतूक विस्कळीत!

**अकोला** : शहरातील अनेक प्रमुख चौकांतील वाहतूक सिग्नल बहुतांश वेळा बंद राहत असल्याने वाहनचालकांना मोठ्या प्रमाणावर अडचणी येत आहेत. यामुळे वाहतूक विस्कळीत होत असून, अपघात होण्याची शक्यता वाढली आहे. शहरातील प्रमुख रस्ते आणि चौकांमध्ये वाहतूक नियंत्रणासाठी सिग्नल बसवण्यात आले असले तरी, ते बंद असतात किंवा योग्यरीत्या कार्यरत नसतात. त्यामुळे वाहनचालकांना अंदाजावर वाहन चालवावे लागते.

# केरळला कामासाठी निघालेल्या तरुणाचा संशयास्पद मृत्यू

**▪तेल्हारा,दि ५ (प्रतिनिधी):**
केरळमध्ये काम करण्यासाठी निघालेल्या पाच मित्रांपैकी एकाचा मृत्यू झाला असून, हा अपघात नसून घातपात असल्याचा आरोप मृतकाच्या नातेवाईकांनी केला आहे. मृतक प्रेम गोपाल सारवान (२६, रा. तेल्हारा) याचा मृतदेह ४ एप्रिल रोजी जळगाव जिल्ह्यातील वरणगाव रेल्वे ट्रॅकवर आढळून आला. तेल्हाऱ्यातील तीन तरुण व प्रताप चौकातील एक तरुण असे चार जण केरळला कामासाठी ३ एप्रिल रोजी रवाना झाले. त्यांनी प्रेम सारवान याला सोबत येण्यासाठी संपर्क साधला. प्रेम अमरावतीहून भुसावळला पोहोचला, जिथे रात्री जेवताना मित्रांसोबत त्याचा वाद झाल्याचे सांगण्यात येत आहे. त्यानंतर केरळला जाण्याचा प्लॅन रद्द झाला व तीन मित्र परत तेल्हाऱ्याला निघून आले; मात्र प्रेम व त्याचा एक मित्र भुसावळमध्ये राहिले. दुसऱ्या दिवशी प्रेमचा मृतदेह वरणगाव ट्रॅकवर सापडला. घटनेतील संशयास्पद बाबी मृतदेहाजवळ त्याच्या मित्राचा मोबाईल सापडला, मात्र संबंधित मित्र तिथे नव्हता. प्रेमच्या खिशात बडनेराकडे जाणाऱ्या गाडीचे तिकीट सापडले, म्हणजे तो परत जाणार होता. मृतकाच्या नातेवाईकांनी याला घातपात ठरवत पोलिसांकडे तक्रार करण्याचा प्रयत्न केला.

# जिल्हा उद्योग केंद्रातर्फे सोमवारी गुंतवणूक परिषद

**▪अकोला,दि ५ (प्रतिनिधी):**
जिल्हा उद्योग केंद्रातर्फे सोमवार, दि. ७ एप्रिल रोजी मूर्तिजापूर रस्त्यावरील हॉटेल आर. जी. एक्सक्लुसिव्ह येथे सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषद आयोजित करण्यात आली आहे. जिल्हास्तरावर गुंतवणूक आकर्षित करणे, जिल्ह्यातील गुंतवणूकदार व व्यावसायिकांना एकत्र व्यासपीठ उपलब्ध करून देणे, तसेच जिल्ह्यांना विकासाचा केंद्रबिंदू मानून राज्याच्या विकासाला चालना देणे या हेतूने उद्योग विभागातर्फे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर व जिल्हाधिकारी अजित कुंभार यांच्या मार्गदर्शनात जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. परिषदेत जिल्ह्यातील विविध क्षेत्रांतील गुंतवणूकदार व राज्य शासन यांच्यात सामंजस्य करार करण्यात येतील. गुंतवणुकीला प्रोत्साहन, औद्योगिक सुविधा, व्यवसाय सुलभीकरण, तसेच उद्योगासाठी आवश्यक परवानगी आणि सेवा काल मर्यादित देण्याच्या दृष्टीने कायदे आदीविषयीचे मार्गदर्शन तज्ज्ञांकडून होणार आहे.

जिल्ह्यातील सर्व उद्योजक व गुंतवणूकदारांनी उपस्थित राहावे असे आवाहन केंद्राचे महाव्यवस्थापक संतोष बनसोड यांनी केले आहे.

# एप्रिलमध्ये शालीमार, गीतांजलीसह २० रेल्वेगाड्या रद्द

**▪अकोला,दि ५ (प्रतिनिधी):**
संत्रागाची येथे यार्डाच्या विस्ताराचे काम आणि बिलासपूरजवळ चौथ्या रेल्वे मार्गाची जोडणी सुरू झाल्याने मार्गे धावणाऱ्याजळगाव, भुसावळ २० रेल्वेगाड्या एप्रिल महिन्यात रद्द करण्यात आल्या आहेत. त्यात शालिमार, गीतांजली आदी एक्स्प्रेस गाड्यांचा समावेश आहे. संत्रागाची- पुणे एक्स्प्रेस १४ व १९ एप्रिल, पुणे - संत्रागाची १४ व २१ एप्रिल,



सीएसएमटी मुंबई-हावडा गीतांजली एक्स्प्रेस १३ व २० एप्रिल रोजी रद्द करण्यात आल्याची माहिती रेल्वेने दिली आहे.

# अकोला येथे भव्य-दिव्य श्री श्याम भजन संध्येचे आयोजन

**▪अकोला,दि ५ (प्रतिनिधी):**
श्याम जगत चे अतिशय प्रख्यात भजन गायक श्री राज पारीक कोलकाता यांचे मधुर वाणीतून दिनांक १० एप्रिल गुरुवार रोजी श्री. श्याम बाबा भव्य भजन संधेचे आयोजन सिटी स्पोर्ट क्लब मूर्तिजापुर रोड अकोला येथे करण्यात आले आहे.भजन संध्येत स्थानिक गायक श्री उमेशजी शर्मा व श्री गोपाल शर्मा यांची सुध्दा पारेक यांना साथ लाभणार आहे.भजन संध्या संध्याकाळी ६:०० वाजता सुरू होवून श्री प्रभु ईच्छा पर्यंत सुरू राहून महाप्रसाद ९:३० वाजता सुरू होणार आहे सोबतच सालासर बालाजी आणि जीणमाता यांचा दरबार, आकर्षक झांकी सुध्दा लागणार आहे अशी माहिती आयोजक गोरक्षण रोड चा राजा विघ्नहर्ता गणेश उत्सव मंडल अकोला यांनी दिली आहे. राज पारीक हे भारतीय गायक, गीतकार आणि संगीतकार आहेत, त्यांचा जन्म राजस्थान जिल्ह्यातील सोनथाली नावाच्या दुर्गम गावात महेश कुमार पारीक आणि बबिता देवी पारीक यांच्या घरात झाला. जन्मा नंतर ते कोलकात्याला गेले.

राज पारीक हे एक प्रसिद्ध भक्ती संगीत गायक आहेत, ज्यांनी वयाच्या ७ व्या वर्षी त्यांच्या वडिलांसोबत भक्ती गीत सादर करताना गायन कलेची आवड ओळखली व त्यांनी कोलकाता येथे श्री जैन विद्यालय मधून शिक्षण पूर्ण केले. त्यांनी वयाच्या १५ व्या वर्षी गायनाला वेगळे रूप दिले आणि संपूर्ण भारतभर स्टेज शो आणि खास कार्यक्रमात भाग घेतला. आज पर्यंत त्यांनी शेकडो भजन संध्या कार्यक्रम यशस्वी केले.तरी सिटी स्पोर्ट क्लब मूर्तिजापुर रोड अकोला येथे जील्हातील सर्व श्यामप्रेमी यांनी भजन संध्येत उपस्थित राहून श्याम बाबा चा भजन रुपी रस ग्रहण करावा असे आवाहन गोरक्षण रोड चा राजा विघ्नहर्ता गणेश उत्सव मंडल अकोला यांनी केले आहे.

# बिबट्याच्या हल्ल्यात गाय ठार !

**▪पातुर,दि ५ (प्रतिनिधी):**
आगिखेड- - पातूर रस्त्यावर सतलवन भागात बिबट्याच्या हल्लयात एका शेतकऱ्याची गाय ठार झाली. हा प्रकार बुधवारी रात्री घडला.यामुळे शेतकऱ्याचे २२ हजार रुपयांचे नुकसान झाले असून, ग्रामस्थांनी वन विभागाकडे तक्रार दाखल केली आहे. गेल्या काही दिवसापासून खानापूर, आगिखेड परिसरामध्ये बिबट्याचे दर्शन होत आहे. पातूर येथील शेतकरी शे. गुलाब शे. बन्नू यांच्या सोतलवन भागातील शेतात बांधलेल्या गायीवर बिबट्याने बुधवारी रात्री हल्ला केला. अचानक झालेल्या या हल्लयामुळे गाय जागीच ठार झाली. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. या घटनेमुळे शेतकरी व ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. गावकऱ्यांनी वन विभागाला तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

# राम प्रकटोत्सव : साफसफाई, हॅलोजन लावण्याजे निर्देश!

## मनपा आयुक्त डॉ.सुनील लहाने यांनी घेतला आढावा

**▪अकोला,दि ५ (प्रतिनिधी):**
श्रीराम प्रकटोत्सवनिमित्त अकोला शहरातील २७ राम मंदिराच्या परिसराची साफसफाई व त्या परिसरात हॅलोजन लाइट लावून महानगरपालिकेने त्या भागातील रस्त्यांची दुरुस्ती करावी, अशा सूचना माजी महापौर भाजप नेते विजय अग्रवाल यांनी आयुक्त सुनील लहाने यांना दिल्या आहे.

अकोला जिल्हा व महानगर हरिहर नगर म्हणून ओळखला जातो. राम आणि कृष्ण भक्तांसोबत महादेव भक्तांची संख्या मोठी असून, श्रीराम आणि महादेव यांचे विशाल जागृत मंदिर अकोल्यात असून, मोठे राम मंदिर गांधी रोड, राम मंदिर बिर्ला, राम मंदिर तपस्वी बाबा, राम मंदिर सालासर, राम हनुमान राम मंदिर, गोरक्षण रोडवरील पूर्ण राम मंदिर, मोठ्या उमरीतील राम मंदिर, रेणुका



राम मंदिर, जलाराम राम मंदिर, अनिकट येथील राम मंदिर, कैलास टेकडी येथील राम मंदिर, खेतान नगर येथील राम मंदिर, जवाहर नगर राम मंदिर तसेच अकोटपैल येथील राम मंदिर, संतोषी माता राम मंदिर, राजेश्वर राम मंदिर, मुळे राम मंदिर या सर्व मंदिरांच्या परिसरात विशेष साफसफाई करून त्या भागामध्ये पथदिवे बंद आहे की चालू आहे याची पाहणी करून ताबडतोब पथदिवे लावण्यात यावे व रामभक्तांना गैरसोय होणार नाही याची दक्षता मनपा आयुक्तांनी घ्यावी, अशा सूचना आमदार रणधीर सावरकर, खासदार अनुप धोत्रे तसेच माजी महापौर अर्चना मसने, विजय अग्रवाल यांनी दिल्या असून, ठिकठिकाणच्या रस्तेदुरुस्ती संदर्भातसुद्धा सूचना देण्यात आल्या आहेत. साफसफाइसाठी विशेष पथक निर्माण करून विहिंप रामनवमी शोभायात्रा मार्गावरसुद्धा पथदिवे लावून व्यवस्था करण्यात यावी अशा सूचना देण्यात आल्या आहे. तसेच शोभायात्रा समारोपानंतर रस्त्यांची साफसफाइ त्याच दिवशी ताबडतोब करण्यात यावी, अशा सूचना विजय अग्रवाल यांनी दिल्या आहेत.

# बाळापूर येथून देशी बनावटीच्या पिस्तूलसह मॅक्झिन जप्त



**▪अकोला,दि ५ (प्रतिनिधी):**
येथील मच्छी मार्केट परिसरात एक इसम देशी बनावटीचे पिस्तूल (अग्निशस्त्र) आणि एक मॅक्झिन घेऊन फिरत असल्याची माहिती मिळाली.यावरून त्या इसमास ताब्यात घेऊन झडती घेतली असता वरील साहित्य मिळून आले. ही घटना ४ एप्रिलला घडली आहे. बाळापूर पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक अनिल जुमडे यांना गोपनीय माहिती मिळाली की, मच्छी मार्केट बाळापूर या परिसरात सिद्दिक असिफ सिद्दिक युनूस (२६) राहणार इस्लामपुरा बाळापूर हा अग्निशस्त्र बाळगून आहे. अशा माहितीवरून दोन पंचांसमक्ष त्याची अंगझडती घेतली असता त्याच्या ताब्यातून देशी बनावटीचे अग्निशस्त्र, एक मॅक्झिन किंमत १० हजार रुपयांचा मुद्देमाल मिळून आला. त्यामुळे सिद्दीक आसिफ यास अटक करून त्याच्याविरुद्ध भारतीय हत्यार अधिनियम कलम ३.२५ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाइ पोलिस अधीक्षक बच्चन सिंह, अप्पर पोलिस अधीक्षक अभय डोंगरे व उपविभागीय पोलिस गजानन अधिकारी बाळापूर पडघन यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक अनिल जुमडे यांनी केली आहे.

## थोडक्यात

### रामनवमीनिमित्त आज 'रामप्रसाद'!

**अकोला** : श्री संत गजानन महाराज यांच्या पावन स्पर्शाने पवित्र शताब्दीपूर्व मोठ्या राम मंदिर परिसरात राम प्रकटोत्सवनिमित्त रविवार, ६ एप्रिल रोजी 'रामप्रसाद' खिचडी वाटप राम जन्मोत्सवनिमित्त यावेळी महाआरती झाल्यावर मंदिर परिसरातील जागृत रामेश्वर हनुमान मंदिरजवळ वितरण करण्यात येणार आहे. स्थानिक राम नगर मित्र मंडळ व श्री जानकी वल्लभी सरकार धर्मार्थ संस्था तसेच श्रीराम हरिहर संस्था यांच्या सहकार्याने दुपारी १२ वाजता प्रभू रामचंद्राला नैवेद्य लावून करण्यात येणाऱ्या रामप्रसाद खिचडी प्रसादचा लाभ घ्यावा, अशी विनंती श्रीराम नगर मित्र मंडळ व श्री जानकी वल्लभी सरकार धर्मार्थ संस्था व श्रीराम संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.यावेळी महाआरती करण्यात येणार आहे व राम प्रकटोत्सव साजरा करण्यात येणार आहे. या कार्यक्रमात सर्व धर्मप्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे अशी विनंती करण्यात आली आहे.

### ह्यूमन राइट्स जस्टिस असोसिएशनची बैठक संपन्न

**अकोला** : ह्यूमन राईट्स जस्टिस असोसिएशन अकोला जिल्ह्याची बैठक शासकीय विश्राम भवन अकोला येथे जिल्हाध्यक्ष प्रा. सुरेश मोरे सर यांच्या अध्यक्षतेखाली चिंतन बैठक घेण्यात आली. प्रमुख पाहुणे राष्ट्रीय सचिव संघपाल सिरसाट, महाराष्ट्र सचिव राहुल जाधव हे होते. त्या बैठकीमध्ये तालुका व जिल्हा स्तरावर मिटींग घेऊन संघटनेची कार्यकारिणी तयार करणे, समाजाच्या समस्या सोडवून न्याय मिळवून देणे, शैक्षणिक समस्या, बेरोजगार समस्या विचार बैठकीमध्ये सर्वानी मांडले.

# सिटी कोतवाली चौकात भव्य झांकीचे उद्घाटन

## भाजपा लोकप्रतिनिधी,श्रीराम भक्तांची लक्षणीय उपस्थिती

**▪अकोला,दि ५ (प्रतिनिधी):**
विहिप - रामनवमी सेवा शोभायात्रा समितीच्यावतीने स्थानिक महाराणा प्रताप चौक येथे रामनवमीनिमित्त भव्य झांकी उभारण्यात आली आहे. या झांकीचे उद्घाटन शुक्रवारी सायंकाळी आमदार वसंत खंडेलवाल यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रभू श्रीरामजींच्या प्रतिमेची पूजा करून व दिवंगत आमदार गोवर्धन शर्मा यांच्या प्रतिमेला वंदन करून झांकीचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी भाजपचे प्रदेश सरचिटणीस आमदार रणधीर सावरकर, कृष्णा गोवर्धन शर्मा, गोपाल शर्मा, रामनवमी शोभायात्रा समितीचे अध्यक्ष बंटी कागलीवाल, रामप्रकाश मिश्रा, विजय अग्रवाल, जयंत मसने, किशोर मांगटे, अर्चना कृष्णा शर्मा, भाजपा महिला आघाडीचे अध्यक्ष चंदा शर्मा व रामभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# रेल गावात उत्साहात पार पडला शिव पार्वती विवाह सोहळा

## आदिवासी कोळी महादेव समाजाची परंपरा

अकोला: जिल्ह्यातील रेल गावात आदिवासी कोळी महादेव समाजाच्या पारंपरिक पद्धतीने भगवान महादेव आणि देवी पार्वती यांचा विवाह सोहळा मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. या लग्नात जेवणावळी, देवकुंडी, वरात, वाजंत्री, पाहुण्यांची लगबग असते.वधू-वराकडील मान-सन्मान यांचा विधी केला जातो. मंगलाष्टके केली जातात. अनादी काळापासून हा लग्नसोहळा उत्साहात पार पडतो. असा हा आगळा वेगळा विवाह सोहळा आज शनिवार ५ एप्रिल रोजी पार पडला. हा लग्नसोहळा रेल येथील रेलेश्वर संस्थानच्या वतीने दरवर्षी चैत्र महिन्यातील नवमीला साजरा करण्यात येतो, अशी माहिती आयोजक तथा संस्था अध्यक्ष सुधाकर घुगरे यांनी दिली.

अकोला जिल्ह्यातील अकोट तालुक्यातील चोहोट्टा बाजार येथून पाच किलोमीटर अंतरावर असलेल्या रेल गावात मोठ्या धूमधडाक्यात ५ एप्रिल रोजी शिव पार्वती विवाह सोहळा धूमधडाक्यात साजरा झाला. आदिवासी कोळी महादेव जमतीने अनेक वर्षापासूनची देवाच्या लग्नाची ही परंपरा जोपासली आहे. आगळ्या वेगळ्या देवाच्या या लग्न सोहळ्यासाठी शनिवारी सकाळपासूनच वर व वधू कडील पाहुणे मंडळीनी गावात हजेरी लावली होती. वाजंत्री, मंगलाष्टके सारं काही धार्मिक रिती रिवाजानुसार एखाद्या खऱ्या लग्नासारखे वातावरण याठिकाणी पाहायला मिळाले.

हा लग्नसोहळा साजरा करण्याची परंपरा रेल गावात हजारों वर्षापासून स्थानिक आदिवासी कोळी जमातीच्या लोकांनी जोपासली आहे. या लग्न सोहळ्याचा मान घुगरे आणि इंगळे परिवाराकडे असतो. इंगळे परिवाराची वधू माता श्रीपार्वती, तर घुगरे कुटुंबीयांकडे वर भगवान महादेव यांचा मान आहे. अनादी काळापासून हा लग्नसोहळा मोठ्या उत्साहात पार पडत असल्याचं गावातील वयोवृध्द सांगतात.

# भीक नको पण कुत्र आवर म्हणायची रेशनधारकांवर वेळ

**▪अकोला,दि ५ (प्रतिनिधी):**
रेशन कार्ड धारकांना प्रथम केवायसी, नंतर राशनकार्डला आधार कार्ड जोडणे, आणि ई-केवायसीनंतर आता पुन्हा एकदा आपले राशन कार्ड अपात्र ठरू नये, यासाठी राशन दुकानांवर द्यावा लागेल, फॉर्म भरून ज्यासाठी पुन्हा कुटुंबातील सर्व सदस्यांचे आवश्यक प्रमाणपत्र देण्यासाठी नागरिकांना धावपळ करावी लागणार आहे, हे पाहता पुन्हा एकदा नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागू शकतो. जेव्हापासून राशनचे धान्य मोफ्रत करण्यात आले आहे, तेव्हापासून राशन ग्राहकांच्या मागे अडचणींची मालिका लागली आहे. प्रथम राशन कार्डसाठी केवायसी करण्यासाठी नागरिकांना आवश्यक प्रमाणपत्रांसाठी बरीच धावपळ करावी लागली होती, त्यानंतर राशन कार्डला आधार कार्ड जोडण्यासाठी नागरिकांना कामाला जुंपावे लागले होते, यानंतर आता-आता ई-केवायसीसाठी राशन कार्डधारक नागरिकांच्या घरातील सर्व सदस्यांना राशन दुकानांवर जाऊन ई-केवायसी करावी लागली होती, अजूनही जिल्हयात २७३ राशन कार्डधारकांची ई-केवायसी होणे बाकी आहे.



ही सर्व प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी राशन कार्डधारकांना आपले कामकाज सोडून आवश्यक प्रमाणपत्रे जमा करण्यासाठी बरीच धावपळ करावी लागली होती. आता इतके काय कमी होते, की आता पुन्हा राशन कार्डधारकांना आपले राशन कार्ड पात्र ठरवण्यासाठी राशन दुकानांवर फॉर्म भरून द्यावा लागेल. राज्यात अपात्र राशन कार्ड शोधण्यासाठी अभियान सुरू करण्यात आले आहे, या अंतर्गत ३१ मे पर्यंत अपात्र राशन कार्डधारकांना शोधण्याची मोहीम चालवली जाईल. अंत्योदय आणि प्राधान्य कुटुंब आणि पांढ? या राशन कार्डधारकांना पुन्हा फॉर्म भरून द्यावा लागेल.

या तपासणीत ज्या सरकारी, अर्धसरकारी आणि खासगी कंपन्यांच्या कर्मचा? यांचे वार्षिक उत्पन्न १ लाख रुपयांपेक्षा जास्त असेल, अशा कर्मचा? यांचे पिवळे अथवा केशरी राशन कार्ड तात्काळ अपात्र घोषित करून रद्द केले जाईल. अशा कर्मचा? यांना त्यांच्या उत्पन्नानुसार दुसरे राशन कार्ड प्रदान केले जाईल. शुक्रवारी राज्याच्या पुरवठा विभागाने या अभियानाच्या संबंधात परिपत्रक जारी केले आहे.यानुसार तपासणी अभियानात राशन दुकानांवर हे फॉर्म उपलब्ध करून दिले जातील. राशन कार्डधारकांना फॉर्मसोबत हमीपत्र देखील द्यावे लागेल.

यासोबतच घराच्या पत्त्यासाठी आधार कार्ड, मतदार ओळखपत्र, वाहन चालक परवाना, वीज बिल इत्यादी विविध कागदपत्रांच्या प्रती जोडाव्या लागतील. फॉर्ममध्ये राशन कार्डधारक कुटुंबातील सर्व सदस्यांचे एकूण वार्षिक उत्पन्न सांगावे लागेल. १५ दिवसांच्या आत कागदपत्रे जमा न केल्यास राशन कार्ड निलंबित केले जाईल. जर कोणत्याही राशन कार्डधारकाचे कागदपत्र संशयास्पद वाटल्यास त्याची तपासणी पोलिसांकडून केली जाईल. विदेशी नागरिकांचे राशन कार्ड रद्द केले जाईल.

# सर्वगुणसंपन्न प्रभू श्रीराम




जगभरातील कोट्यवधी हिंदूंचे आराध्य दैवत असलेल्या प्रभू श्रीरामचंद्रांची जयंती अर्थात श्रीरामनवमी म्हणजे रामभक्तांसाठी आनंदाची पर्वणी असते. जगाच्या पाठीवर रामराज्य हे सर्वार्थाने आदर्श असण्याचे गुपित श्रीरामांमध्ये असलेल्याला अगणित गुणांमध्ये आहे. उपास्य देवतेसंदर्भात उपयुक्त माहिती मिळाल्यावर त्या देवतेप्रती श्रद्धा वाढण्यास साहाय्य होते. आपलीही श्रीरामांप्रतीची श्रद्धा वाढीस लागून श्रीरामाच्या अस्तित्वाचा आपल्या सर्वांना लाभ व्हावा ही श्रीरामप्रभुंच्या चरणी प्रार्थना !

**१. आदर्श राजा :** सीतामाता, श्रीलक्ष्मण यांसह श्रीराम वनवासातून अयोध्येत परतल्यानंतर एका परिटाने सीतामातेविषयी संशय व्यक्त केला तेव्हा श्रीरामांनी प्रजेच्या मनात कोणत्याही प्रकारचा संभ्रम नको म्हणून तात्काळ सीतामातेचा त्याग केला. ज्या अर्धांगिनीने श्रीरामांना वनवासात साथ दिली तिचा एका परिटाच्या संशयावरून त्याग करताना श्रीरामांनी एका राजासाठी प्रजा किती महत्वाची असते हे स्वतःच्या वर्तणुकीतून दाखवून दिले.

श्रीरामाने राजधर्माचे पालन केले नाही असा चुकीचा संदेश येणाऱ्या पिढीकडे जाता कामा नये यासाठी श्रीरामाने आपल्या सहचारिणीचाही त्याग केला. जनतेच्या पैशांतून आपल्या सात पिढ्या बसून खातील एवढी माया गोळा करणारे हल्लीचे राजकारणी कुठे आणि जनतेच्या मनातील संभ्रम दूर करण्यासाठी प्रसंगी धर्मपत्नीचाही त्याग करणारे प्रभू श्रीराम कुठे.

**२. शत्रुवरही प्रेम करणारा :** रावणाचा वध केल्यानंतर श्रीरामाने रावणाचा बंधू विभीषणाला त्याचा अंत्यसंस्कार करण्यास सांगितले. तेव्हा विभीषणाने त्यास नकार दिला. 'मरणांती वैराणी' या वचनानुसार मृत्यूंनंतर वैरही संपते त्यामुळे तू जर रावणाचा अंत्यसंस्कार करायला तयार नसशील तर मी करतो, माझाही तो बंधूच होता असे प्रभू श्रीरामचंद्रानी विभीषणला निक्षून सांगितले.


**जगन घाणेकर**
**घाटकोपर, मुंबई.**
**९६६४५५९७८०**

अखेर विभीषण श्रीरामांच्या सांगण्यावरून रावणाचा अंत्यसंस्कार करण्यास तयार झाला. रावण महादेवाचा थोर भक्त होता. भक्तीच्या बळावर त्याने प्रचंड बळ आणि सिद्धी हस्तगत केल्या होत्या ज्याचा त्याला गर्व झाला होता. श्रीरामांनी रावणाचा वध करून केवळ त्याची भूलोकीची यात्रा संपवली नाही, तर त्याचे गर्वहरण करून त्याचा कायमचा उद्धारही केला.

**३. आदर्श पुत्र :** श्रीराम सर्वार्थाने आदर्श पुत्र होते. प्रभू श्रीरामाच्या राज्याभिषेकाची सिद्धता सुरु असतानाच सावत्र आई कैकयीने जेव्हा श्रीरामांच्या वनवासाच्या हट्ट धरला तेव्हा कोणतेही आढेवेढे न घेता श्रीरामांनी वनवासात जाण्यास तत्परतेने होकार दिला.

वल्कले परिधान केली आणि वनवासात जाण्यासाठी सिद्ध झाले. वनवासाहून आल्यानंतर श्रीरामांनी कैकयी मातेचे आशीर्वाद घेतले. कोणताही पूर्वग्रह न बाळगता ते कैकयी मातेशी पूर्वीप्रमाणे प्रेमाने वागू लागले. कुठे सत्तेच्या हव्यासापोटी आपल्या रक्ताच्या नातेवाईकांशी वैराने वागणारे हल्लीचे राज्यकर्ते आणि कुठे वडिलांनी सावत्र आईला दिलेल्या वचनाच्या पूर्ततेसाठी साऱ्या वैभवावर पाणी सोडणारे प्रभू श्रीराम !

**४. आदर्श बंधू :** आजही दोन भावांत प्रेमाचे नाते दिसले कि त्यांना आपण राम लक्ष्मणाची जोडी म्हणून संबोधतो. यावरून श्रीराम आणि लक्ष्मण यांमध्ये किती प्रेमाचे नाते होते हे लक्षात येते.

वनवास श्रीरामांना देण्यात आला होता मात्र लक्ष्मणाने सारे वैभव सोडून श्रीरामांची साथ दिली. श्रीरामांनीही संपूर्ण वनवासकाळात लक्ष्मणाची सर्वार्थाने काळजी घेतली. बंधू वनवासात गेला असताना अयोध्येचे राज्य उपभोगायची संधी मिळाल्यावरही भरताने श्रीरामाच्या पादुका सिंहासनावर ठेवून विश्वस्त म्हणून राज्याचा कार्यभार सांभाळला. यावरूनच श्रीरामांनी भरताला काय ताकदीचे बंधुप्रेम दिले होते याची कल्पना येते.

ज्या काळात रावणाने बंधू विभीषणाला सापत्न वागणूक दिली. वालीने बंधू सुग्रीववर अन्याय केला होता त्याकाळात आदर्श बंधूप्रेमाचा परिपाठ श्रीरामांनी घालून दिला. वडिलांच्या संपत्तीमध्ये अधिकाधिक वाटा मिळण्यासाठी एकमेकांचा जीव घेण्यास उठणाऱ्या आताच्या बंधूंनी श्रीराम लक्ष्मणाच्या नात्यातून बोध घ्यायला हवा.

**५. संघटन कुशलता :** रावणाने सीतेचे हरण केल्यानंतर श्रीविष्णूचा अवतार असलेले श्रीराम रावणाला सहजपणे पराभूत करून सीतेला घेऊन येऊ शकले असते. एका हाताने शिवधनुष्य पेलणाऱ्या श्रीरामाचे सामर्थ्य काय होते याची कल्पना रावणालाही होती.

अयोध्येहून सैन्य मागवून रावणावर चाल करूनही श्रीराम जाऊ शकले असते; मात्र त्यांनी तसे न करता वानरसेनेला संघटित करून त्यांची मने जिंकली आणि असुरी शक्तीविरोधात लढण्यासाठी मोठी फौज सिद्ध केली. वालीचा वध करून सुग्रीवाला जवळ केले. यावरून श्रीरामांमधील संघटनकौशल्य लक्षात येते.

**६. एकपत्नीव्रत :** ज्या काळात राजे आणि राजपुत्र अनेक विवाह करत त्या काळातही प्रभू श्रीरामांनी एकपत्नीव्रत आचरले होते. अश्वमेध यज्ञाच्या प्रसंगी पत्नीची आवश्यकता असताना प्रभू श्रीरामांनी दुसरा विवाह न करता सीतामातेची प्रतिकृती बनवून ती पत्नी म्हणून सोबत बसवली. पत्नीप्रती त्यांची निष्ठा या एका उदाहरणावरून लक्षात येते.

**७. त्याग आणि साधेपणा :** सावत्र माता कैकयीच्या वचनाचा आदर ठेवून त्यांनी एका क्षणात सा?या राजसुखाचा त्याग करून वल्कले परिधान केली. वनवासात काट्याकुट्यातून अनवाणी चालले. झोपडीत राहून कंदमुळे खाल्ली, जमिनीवर झोपले. जंगलातील वानरांना आणि अस्वलांना त्यांनी प्रेमाने जवळ केले, शबरीची उष्टी बोरे खाल्ली. यातून श्रीरामांतील त्यागाची आणि साधेपणाची जाणीव प्रकर्षाने होते. हल्लीचे राजकारणी निवडणूका आल्या की छायाचित्रे काढण्यापुरते गरिबांच्या झोपड्यांत जाऊन जेवतात(हे जेवणही फाईव्हस्टार हॉटेलमधून मागवलेले असते) कुठे अंगीभूत साधेपणा असलेले प्रभू श्रीराम आणि कुठे साधेपणाचा आव आणणारी आताची राजकीय मंडळी.

पुत्रवियोग सहन न झाल्याने राजा दशरथांनी प्राणत्याग केला. ही बातमी प्रभू रामचंद्रांना कळताच त्यांनी पितृवियोग न करता त्यांच्या पुढील गतीसाठी श्राद्धकर्म केले. यातून धार्मिक विधींचे महत्व अधोरेखित केले आहे.

सीताहरण झाल्यानंतर सीतेच्या वियोगाने दुःखी झालेल्या श्रीरामांनी झाडांना कवटाळल्याचे संदर्भ आढळतात; मात्र भविष्याचेही ज्ञान असलेल्या श्रीरामांचा हा वियोग केवळ दाखवण्यापुरता होता. झाडांना मिठी मारून श्रीरामाने अनेक शापित जीवांना जन्म मृत्यूच्या फेऱ्यातून कायमचे मुक्त केले. शबरीची भेट घेऊन आणि तिने दिलेली उष्टी बोरे खाऊन शबरीचाही उद्धार केला.

अशी एक ना अनेक गुणवैशिष्ट्ये रामायणाच्या वाचनातून लक्षात येतात. यंदाच्या श्रीरामनवमीच्या पावनदिनी आपल्यातही श्रीरामांसारखे गुण यावेत यासाठी प्रभू श्रीरामांच्याच चरणी शरणागत होऊन प्रार्थना करूया !

■ ■ ■

# प्रभू रामचंद्राचे आदर्श अंगीकारावे

चैत्र शुद्ध नवमीला श्रीरामाचा जन्म झाला. याच महीण्यात सात दिवसांनी महाबली हनुमान यांचा जन्म झाला. म्हणजे चैत्र महिन्यात मर्यादापुरुषोत्तम रामांचा जन्म व महाबली हनुमान यांचा जन्म म्हणजे एक दैवी लीलाच म्हणावी लागेल. संपूर्ण भारतात दरवर्षी रामनवमी व हनुमान जन्मोत्सव मोठ्या उत्साहाने व थाटाने साजरी करण्यात येते.

--------------

रामनवमीला भजन, कीर्तन, पालखी व मोठ-मोठ्या झांक्या काढून संपूर्ण भारतात श्री रामांचा जयघोष दिसून येतो व या दिवशी संपूर्ण माध्यमातून श्रीरामाचे नामस्मरण केल्या जाते. भारतात सर्वच धर्मांचे लोक एकोप्याने आणि आनंदाने रहातात. आज भारतात हिंदू धर्मामध्ये संयमता दिसून येते ती फक्त प्रभूराचंद्राच्या आशीर्वादानेच.

श्रीरामाचा जप आपण जन्मापासून तर शेवटपर्यंत करीत असतो. प्रभूराचंद्राचे महत्त्व आणि त्यांची लीला हिंदू धर्माला ज्ञात आहेच. श्रीरामाने १४ वर्षे वनवास भोगला, अहंकारी शक्तीचा सर्वनाश केला, ऋषीमुनी, साधु-संत, गोरगरीब यांचे संरक्षण केले, रावणासारख्या असुर शक्तीचा नाश केला तेव्हाच रामराज्याची स्थापना झाली. श्रीरामांचा इतिहास आणि वास्तव भारतासह जगातील अनेक देशांमध्ये पहायला मिळते.

प्रभु राम सत्यतेचे प्रतीक आहे. त्याचे अनुकरण देशातील लोकप्रतिनिधी, जनप्रतिनिधी स्वयंघोषित समाजसेवक यांनी करून जनसेवा करण्याची नितांत गरज आहे. कारण देशातील ९५ टक्के राजकीय पुढारी अहंकारी वृत्तीचे व भ्रष्टाचाराने लिप्त आहेत. या कलयुगात राजकीय पुढारी समाजसेवेपेक्षा स्वतःची सेवा करण्यात गुंग असतात. मुंह मे राम... बगल में छुरी.... अशा प्रकारची असुरी भावना त्यांच्यात दिसून येते.

गरीब व सर्वसामान्यांचे रक्त पिवून आजचे ९५ टक्के राजकीय पुढारी राक्षसाची भुमिका बजावतांना दिसून येतात. देशात भ्रष्टाचार उफाळलेला आहे. आज देशातील प्रत्येक आजी-माजी आमदार- खासदा-मंत्री व अनेक राजकीय पुढारी करोडपती झालेला आहे.

यामुळेच आज देशात महागाई, बेरोजगारी, भुकमरी, महागडे शिक्षण, शेतकऱ्यांच्या समस्या, आरोग्य विषयक समस्या व शेतकऱ्यांच्या आत्महत्यां यांनी जन्म घेतला आहे.


**रमेश कृष्णराव लांजेवार**
**स्वतंत्र पत्रकार, नागपूर.**
**९९२१६९०७७९**

रामनवमीच्या निमित्ताने देशातील संपूर्ण राजकीय पुढारी, लोकप्रतिनिधी, जनप्रतिनिधी यांना विनंती करतो की रामराज्याची संकल्पना साकार करायची असेल तर आपण वाममार्गाने कमवलेली व भ्रष्टाचार रूपाने कमविलेल्या संपूर्ण संपत्तीचा त्याग करून सरकारच्या तिजोरीत जमा करावी किंवा जनकल्याणासाठी उपयोगात आणावी. यातच खरे प्रभु श्रीराम यांचे दर्शन दिसून येईल. त्याचप्रमाणे भुकेलेल्यांना अन्न हा देवी-देवतांचा मुलमंत्र आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी अंगीकारला पाहिजे.

राजकीय पुढाऱ्यांनी गरिब व सर्वसामान्यांची लुटमार थांबवून आणि महागाई कमी करून समाजकार्य करावे यातच खरा प्रभु रामचंद्राचा आदर्श दिसून येईल व पुन्हा आपल्याला भारतात रामराज्य साकार करता येईल.

जोपर्यंत देश भ्रष्टाचारमुक्त होत नाही तोपर्यंत भारतात रामराज्य शक्य नाही. याकरीता भ्रष्टाचारावर आळा व अहंकारी राजकीय पुढाऱ्यांच्या चल-अचल संपत्तीची कठोर चौकशी करून यांची संपत्ती जनकल्याणासाठी उपयोगात आणली पाहिजे. यातच आपल्याला रामराज्य खऱ्या अर्थाने दिसून येईल.

आजचा राजकीय पुढारी स्वार्थी झाल्यामुळे व यांच्यात असुरी शक्ती निर्माण झाल्याने देशात अनेक नवीन-नवीन समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे देशाच्या १४० कोटी जनतेला आज महागाईचा श्राप बसल्याचे दिसून येते.

या असुरी शक्तीला संपवायचे असेल तर प्रभु रामचंद्राचे आदर्श सामोरं ठेऊन राजकीय पुढाऱ्यांनी समाजकार्य करायला हवे. तेव्हाच भारतात रामराज्य प्रस्थापित होईल.

रामनवमीच्या पावन दिवसांचे औचित्य साधून संपूर्ण रामभक्तांनी, सामाजिक संघटनांनी, प्रशासनाने व सरकारने आजच्या दिवसाला मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करून वाढत्या प्रदुषणावर व बदलत्या हवामानावर आवर घालण्यासाठी वृक्षारोपण करून एक आगळावेगळा उपक्रम राबविला पाहिजे.

यामुळे निसर्ग प्रफुल्लित होईल व आपल्याला प्रत्येक पानात, फुलात,फळात प्रभु श्रीरामचंद्रांचे दर्शन अवश्य होईल. कारण निसर्गाच्या सान्निध्यातच प्रभु रामचंद्र आहेत. जय श्रीराम!

■ ■ ■

कालच्या अंकावरून पुढे

# युध्द नाकारणारा सम्राट अशोक!

माधव कोंडविलकर आपले पुस्तक देवांचा प्रिय राजा प्रियदर्शी सम्राट अशोकह्ल मध्ये म्हणतात की, ह्यह्यकाही बाबतीत चक्रवर्ती सम्राट अशोकांची तुलना, अलेक्झांडर द ग्रेट, ऑगस्टस सीझर, चंगीजखान, तैमूर, रशियाचा पहिला पीटर किंवा पहिला नेपोलियन यांच्याशी केली जाऊ शकते; पण अलेक्झांडरसारखा सम्राट अशोक अति-महत्त्वाकांक्षी नव्हता. ऑगस्टस सीझरसारखा तो एक आदर्श शासनकर्ता होता; पण आपण हुकूमशहा म्हणून ओळखलं जावं असं जे सीझरला वाटायचं तसं अशोकाला कधीच वाटलं नाही. आपली तशी ओळख व्हावी अशी त्याची कधीच इच्छा नव्हती. अशोक एक सामर्थ्यवान सेनापती होता; पण आपल्या पराक्रमाबद्दल, विजयाबद्दल पहिला नेपोलियन जसा सदैव असंतुष्ट असायचा तसं अशोकाचा बाबतीत नव्हतं. प्रजाजनांनी आपल्यावर प्रेम करावं, असं त्याला मनापासून वाटत असे.

मनाचा मोठेपणा किंवा उमदेपणा, मनातला शुद्ध भाव, स्वभावातला प्रामाणिकपणा, स्वतःच्या प्रतिष्ठेबद्दलची किंवा मानमरादा बद्दलच्या स्पष्ट स्वच्छ कल्पना आणि मनातलं सर्वांबद्दलचं प्रेम या अशोकाच्या इतरांपेक्षा वेगळेपणाने जाणवणाऱ्या वैशिष्ट्यांमुळे त्याला गौतम बुद्धांच्या किंवा येशू ख्रिस्ताच्या पंक्तीत नेऊन बसवले होते.ह्ल

अशोकच्या यशाने त्याच्या भावांचा दुस्वास अजून वाढला, घरातील वाढत्या अशांततेमुळे व सुसीमने बिंदुसारला अशोकाविरुद्ध भडकावले, या वादातून तात्पुरता मार्ग म्हणून बिंदुसारने अशोकला काही काळ अज्ञातवासात जाण्याचा सल्ला दिला, तो त्याने पाळला. या काळात अशोकने कलिंगमध्ये जाउन वास्तव्य केले. या काळात त्याची कौरवाकी या कोळी मुलीशी ओळख झाली. ती नंतर अशोकची दुसरी अथवा तिसरी पत?नी बनली. अशोकच्या काही कोरीवकामांवर तिचे उल्लेख आहेत. मध्यंतरीच्या काळात उज्जैन मध्ये हिंसक उठाव झाला, बिंदुसारने अ श ा े क ल ा ा अज्ञातवासातून बाहेर येऊन हा उठाव शमवण्यास सांगितले. अशोक उज्जैनला गेला व एका लढाईत घायाळ झाला. त्या काळात असे मानतात की सुसीमद्वारे अशोकवर अनेक हिंसक हल्ले झाले, जे परतावून लावण्यात आले. अशोकची शुश्रूषा करण्यासाठी बौद्धधर्मी परिचारकांची नेमणूक करण्यात आली होती. यातील एक परिचारिका देवी हिच्याशी अशोकचा विवाह झाला. देवी ही विदिशा येथील एका व्यापा??याची मुलगी होती. ती बौद्धधर्मी असल्याने बिंदुसाराला हा विवाह पसंत पडला नाही. त्याने अशोकला पाटलीपुत्रमध्ये रहाण्यास मनाई केली व अशोकला उज्जैन येथील प्रमुख करून टाकले.



उत्तरार्ध

अशोकाने आपल्या कारकिर्दीत राज्यात अनेक रुग्णालये व महामार्गाचे जाळे निर्माण केले, रस्त्यांच्या कडेला वृक्षांची लागवड ही अशोकाचीच कल्पना आहे, असे मानतात. आपण सम्राट असल्याच्या अधिकाराचा फायदा त्याने समाजोपयोगी कार्यासाठी केला. त्यानंतर अशोकाला धम्मअशोक असे म्हणू लागले. अशोकाने धम्माची प्रमुख आचारतत्त्वे विशद केली, अहिंसा, सर्व जातिधर्मांबद्दल सहिष्णुता, वडिलधाऱ्या माणसांना मान देणे, संतांना, शिक्षकांना योग्य तो मान देणे, दासांना माणुसकीने वागवणे. अशा आचारतत्त्वांना जगात कोणताही समाज नाकारू शकणार नाही. अशोकाच्या इतिहासकारांनुसार त्याने कलिंगाच्या युद्धानंतर कोणतेही प्रमुख युद्ध छेडले नाही परंतु त्याला शेजारी राष्ट्रांशी ग्रीक राज्ये, चोल साम्राज्य याच्याशी त्याला नेहमी युद्धाची शक्यता वाटत होती.

परंतु अशोकाने पूर्वायुष्यातील केलेल्या मोहिमांमुळे व मगधच्या सामर्थ्यामुळे अशोकने बौद्ध धर्म स्वीकारला तरी त्याच्या शेजारी राज्यांनी त्याला छेडण्याचे साहस केले नाही. तसेच बौद्ध धर्म स्वीकारला, अहिंसा हे राष्ट्रीय धोरण बनवले तरी मगधाचे सैनिकी सामर्थ्य अबाधित ठेवले. अशोकाला ग्रीक जगताची माहिती होती असे कळते. तसेच चंद्रगुप्त मौर्याने केलेल्या ग्रीकांविरुद्धच्या मोहिमांमुळे मौर्य साम्राज्याची कीर्ती ग्रीस, इजिप्तपर्यंत पोहोचली होती असे कळते.

अवघ्या जगाने गौरवलेला सम्राट अशोक मात्र दुर्दैवाने काही काळ भारताच्या विस्मृतीत गेला, ती स्मृती जागविण्याची भारताला आज अत्यंत गरज आहे. कारण हा देशच अशोकाचा आहे, हे विसरुन चालणार नाही.

--------------------

**प्रविण बागडे**
**नागपूर. 9923620919**
pravinbagde@gmail.com

■ ■ ■

# रामभक्त शबरी

**सौ. रमा देशमुख**

रामायणातील अनेक प्रसंग आणि व्यक्तिरेखा सर्वश्रुत आहेत. परंतु, रामभक्त शबरीचा उल्लेख प्रामुख्याने श्रीरामांना उष्टी बोरे खाऊ घालणारी म्हणून केला जातो. मात्र, तिच्या या कृतीमागील तिचा भक्तीभाव आणि त्याग अनेकांना माहीत नाही.

वाल्मिकी ऋषींच्या रामायणानुसार, शबरी ही एक कठोर तपस्विनी आणि सिद्ध स्त्री होती. तिचे मूळ नाव श्रमणा होते. ती शबर भिल्ल जमातीच्या प्रमुखाची कन्या असल्याने तिला शबरी असे नाव मिळाले.

**त्यागाची सुरूवात : शबरीचे वनगमन**

जेव्हा शबरी अवघी दहा वर्षांची होती, तेव्हा तिच्या विवाहाची तयारी सुरू झाली. गावच्या प्रथेनुसार, लग्नाच्या दिवशी बोकडांचा बळी देऊन मेजवानी देण्याची प्रथा होती. शबरी बोकडांसोबत खेळायची आणि त्यांना लळा लावला होता. जेव्हा तिला समजले की हे बोकड विवाहाच्या दिवशी बळी दिले जातील, तेव्हा ती अतिशय व्यथित झाली.

तिने आई-वडिलांना विनंती केली की, हे बोकड मारू नका. मात्र, तो त्यांच्या कुळधर्माचा भाग असल्याने त्यांनी स्पष्ट नकार दिला. यामुळे शबरीने एक धाडसी निर्णय घेतला– आपण विवाहच करणार नाही! अर्ध्या रात्री, सर्वजण झोपले असताना, तिने सर्व बोकडांना मोकळे सोडले आणि घर सोडून निघून गेली.

विचार करत करत ती दूर दंडकारण्यात पोहोचली. तिथे मातंग ऋषींचा आश्रम होता. ती आश्रमाजवळ राहू लागली आणि अज्ञातपणे सेवा करू लागली. मातंग ऋषी स्नानासाठी नदीवर जात, तो मार्ग शबरी स्वच्छ करत असे. तिने काटे, दगड बाजूला सारून मऊ वाळू पसरवली. हे सर्व ती पहाटे उठून अंधारात करत असे, जेणेकरून कोणीही तिला पाहू नये.

अखेर ऋषींना समजले की, कुणीतरी निस्वार्थ भावाने त्यांची सेवा करत आहे. त्यांनी आपल्या शिष्यांना शोध घ्यायला सांगितले आणि शबरी सापडली.

ती घाबरून मातंग ऋषींच्या चरणी लीन झाली. ऋषींनी प्रेमाने तिच्या डोक्यावरून हात फिरवत विचारले,

बाळा, तू कोण? आणि येथे का आली आहेस? शबरीने आपली सर्व कथा सांगितली. तिच्या भक्तीने प्रसन्न होऊन ऋषींनी तिला आश्रमात स्थान दिले.

**गुरुवचन आणि श्रीरामांची प्रतीक्षा**

शबरी मोठी झाली. एक दिवस मातंग ऋषींनी शिष्यांना बोलावले आणि सांगितले, माझी समाधी घेण्याची वेळ आली आहे. कोणाला काही विचारायचे असल्यास विचारा. शबरीने नम्रतेने विचारले

गुरुदेव, माझे पुढे काय? मी कुठे जाऊ, काय करू? मातंग ऋषींनी सांगितले

तू इथेच राहा, सेवा करत राहा. एक दिवस स्वतः भगवान श्रीराम तुला भेट देतील! गुरूंच्या शब्दांवर अखंड श्रद्धा ठेवून, ती अनंत काळ श्रीरामांच्या आगमनाची वाट पाहू लागली. श्रीराम नेमके कुठल्या दिशेने येणार हे तिला महिती नव्हते म्हणून ती चारही दिशांचा मार्गती रोज फुलांनी सुशोभित करत असे,

शबरी वृद्ध झाली. वर्षानुवर्षे तिने सेवा सुरूच ठेवली. लोक तिला वेडी म्हणू लागले, पण तिने कधीही श्रद्धा सोडली नाही. तिच्या भक्तीमुळे अखेर भगवंताला स्वतः येणे भागच पडले! शबरीने जेव्हा आपल्या डोळ्यांनी प्रभू श्रीरामांना पाहिले, तेव्हा तिच्या आनंदाला पारावार उरला नाही. तिने नम्रतेने त्यांचे स्वागत केले आणि फळे-फुलांनी भरलेले ताट समोर आणले. प्रत्येक बोर गोड आहे की नाही, हे तपासण्यासाठी ती स्वतः चाखत होती!



तिची भक्ती पाहून श्रीराम आनंदित झाले आणि त्यांनी प्रेमाने तीच बोरे स्वीकारली.

शबरी म्हणाली, मी मंदबुद्धी आहे, तुमची स्तुती कशी करू? यावर श्रीरामांनी तिला नवविधा भक्ती चे प्रकार सांगितले.

1. संतांचा संग 2. प्रभूच्या कथा ऐकणे
3. अभिमानरहित सेवा 4. निष्कपट भावाने गुणगान करणे 5. नामस्मरण 6. दृढ विश्वास 7. इंद्रिय-निग्रह 8. समत्वभाव 9. स्वप्नातही दुसऱ्याचे दोष न पाहणे

प्रभू श्रीराम म्हणाले, तुझ्यात या सर्व नऊ भक्ती दृढ आहेत. तू धन्य आहेस, शबरी!

राम-शबरीची नजरानजर होताच, तिथे तेजस्वी अग्नी प्रकट झाला. शबरीने स्वतःच्या योगसाधनेने अग्निस्नान घेतले आणि श्रीरामांसमक्ष पंचमहाभूतांमध्ये विलीन झाली. वनवासी जमातीत जन्म घेतलेल्या शबरीने निस्सीम भक्ती आणि परोपकाराच्या बळावर ब्रह्मसाक्षात्कार मिळवला. शबरीची कथा हे एक अमूल्य जीवनसूत्र आहे. जात, वंश, शिक्षण, धन किंवा बाह्य प्रतिष्ठा नाही, तर निःस्वार्थ भक्तीच भगवंताला प्रिय असते!

■ ■ ■

## रामराज्य आणि हिंदुराष्ट्र

वाचक लिहितात

'श्रीराम हा शब्द भारतीयांच्या जवळचा शब्द, अनेकांचे जीवन या एका नामाने घडवले. त्याचे राज्य म्हणजे रामराज्य, ते आजही परिपूर्ण आदर्श राज्य मानले जाते . जेथे एकमेकां साहाय्य करू अशा व्यवहाराचे सर्वच्या सर्व लोक असतात, जिथे प्रत्येकजण कर्तव्य पालन म्हणजेच धर्मपालन समजतो.

जसे की वृध्द माता पित्याची प्रेमाने काळजी घेणे म्हणजे पुत्र धमार्चे पालन, असे दैनंदिन जीवनात विविध प्रकारचे धर्म पालन आपण करत असतो. अशी आपापली कर्तव्ये चोख पार पाडणारी जनता जिथे असते त्याला रामराज्य म्हणतात. प्रभु श्रीराम मर्यादा पुरुषोत्तम होते. प्रजा म्हणजे केवळ मनुष्य नाही, तर त्यात पशू, पक्षी, जीव, जंतू, वृक्ष, भूमी, वनसंपदा आणि भूमी यांचा समावेश आहे आणि या प्रजेचे दायित्व घेऊन रक्षण करणे, संवर्धन करणे आणि त्याची देखभाल करणे, हे राजाचे कर्तव्य आहे.

हे करत असतांना राजा त्याचे हित पहात नाही. जो राजा स्वहितापेक्षा त्याचा राजधर्म कशात आहे आणि त्याला काय करायचे आहे, एवढेच पहातो, जो स्वतः धर्माचरण करतो आणि इतरांकडून करवून घेतो तोच आदर्श राजा, जसे प्रभू श्रीराम. स्वातंत्र्य नंतरच्या काळात भारतात पाश्चात्त्यांचे अंधानुकरण करणे वाढत गेले. तसेच हिंदूंना धर्माचे शिक्षण न मिळाल्यामुळे ते धर्माचरणापासून दूर गेले. याचे परिणाम म्हणजे नैतिक अधःपतन होत गेले. यामुळे आज आपल्या राष्ट्रासमोर अनेक आव्हाने, समस्या आहेत. या सर्वांवर एकमेव उपाय आणि तो म्हणजे धर्माधिष्ठित राज्य म्हणजे रामराज्य होय!

अखिल मानवजातीच्या हितासाठी हिंदु धर्माधिष्ठित राज्यप्रणालीच हवी ! शांततामय जीवन जगायचे असेल, तर हिंसाचाराची नव्हे, तर सहिष्णुतेची आवश्यकता आहे.

सनातन हिंदु धर्म सहिष्णुतेसारख्या उच्चतम मूल्यांची जोपासना करण्याची शिकवण देतो. त्यामुळे तो जगासाठी कल्याणकारी आहे. हिंदु धर्माधारित राज्यप्रणाली जगभरातील राष्ट्रांनी आचरणात आणल्यास हिंसाचारी प्रवृत्तींचा लोप होईल; परिणामी जगभर युद्धबंदी होऊन अवघे जग शांती आणि आनंद अनुभवील आणि विश्वशांतीचे महान ध्येय साध्य होईल ! यासाठी आपल्या दैनंदिन जीवनात रामराज्य आणण्याचा प्रयत्न करुया.

■ **सौ. वर्षा आवदे, नागपूर.**

# व्हिटॅमिन्सची कमतरता



शरीर निरोगी आणि तंदुरुस्त ठेवण्यासाठी पोषक तत्वांची आवश्यकता असते. जर या पोषक तत्वांची कमतरता असेल तर शारीरिक कमकुवतपणासह अनेक समस्या उद्भवू शकतात.

प्रथिने हे आपल्या शरीरासाठी एक अतिशय महत्त्वाचे पोषक तत्व आहे, जे शरीराच्या पेशी, स्नायू, त्वचा आणि अवयवांच्या दुरुस्ती आणि वाढीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावते. हे रोगप्रतिकारक शक्ती देखील मजबूत करते. अनेकदा लोक चांगला आहार घेत नाहीत आणि त्यामुळे शरीरात प्रथिनांची कमतरता निर्माण होते.

प्रथिनांच्या कमतरतेमुळे शरीरातील ऊर्जेची पातळी कमी होऊ शकते. यामुळे सतत थकवा आणि अशक्तपणा जाणवू शकतो. प्रथिनांचे मुख्य कार्य म्हणजे शरीराची दुरुस्ती करणे आणि ऊर्जा प्रदान करणे. स्नायूंच्या वाढीसाठी आणि दुरुस्तीसाठी प्रथिने सर्वात आवश्यक मानली जातात. जेव्हा प्रथिनांची कमतरता असते तेव्हा स्नायूंची ताकद कमी होते आणि त्यांना योग्यरित्या कार्य करण्यास त्रास होतो. प्रथिनांच्या कमतरतेचा पचनसंस्थेवरही वाईट परिणाम होऊ शकतो.

शरीरात प्रथिनांच्या कमतरतेमुळे भूक न लागणे, सूज येणे आणि पोटदुखी यासारख्या समस्या उद्भवू शकतात. प्रथिनांच्या कमतरतेमुळे पचनाच्या समस्या वाढू शकतात. याशिवाय, प्रथिनांच्या कमतरतेमुळे रोगप्रतिकारक शक्ती देखील कमकुवत होऊ शकते. प्रथिने शरीराला संक्रमण आणि रोगांशी लढण्याची क्षमता देतात. शरीरात प्रथिनांची कमतरता निर्माण झाली की रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत होते. यामुळे सर्दी, खोकला, ताप आणि इतर समस्यांचा धोका वाढतो.

प्रथिनांच्या कमतरतेचा त्वचेवरही परिणाम होतो. प्रथिनांच्या कमतरतेमुळे त्वचेत कोरडेपणा, भेगा आणि ओठ फाटणे यासारख्या समस्या उद्भवू शकतात. यामुळे त्वचेवर पुरळ आणि इतर ॲलर्जीक प्रतिक्रिया देखील होऊ शकतात. केस गळणे हे प्रथिनांच्या कमतरतेचे एक सामान्य लक्षण असू शकते.

प्रथिनांच्या कमतरतेमुळे शरीरात अनेक प्रकारच्या समस्या उद्भवू शकतात, ज्याचा आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतो. जर तुम्हाला यापैकी कोणतीही लक्षणे आढळत असतील तर तुमच्या आहारात प्रथिनांचे प्रमाण वाढवा. जर समस्या गंभीर असेल तर डॉक्टरांचा सल्ला घ्या.

■ ■ ■

**अशोकायन**
**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**



**॥ राम राज्य ॥**

**रामनवमीच्या मुहूर्तावर
संकल्प आपण करू
रामायणातील जीवन तत्वे
थोडी तरी अंगीकारू ... !**

**रामायण कथा आदर्श
मानवी जीवनाचे दर्पण
घेऊन त्यापासून बोध
ठेवू या आपले वर्तन ...**

**रामराज्य होईल साकार
जर राजा व प्रजेने
रामायणातील तत्वांचा
मनस्वी केला स्विकार ...!**

# सॅमसंगकडून भारतात गॅलॅक्सी टॅब एस१० एफई सिरीज लाँच



**गुरूग्राम, ५ एप्रिल :** सॅमसंग या भारतातील सर्वात मोठ्या ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँडने आज गॅलॅक्सी टॅब एस१० एफई आणि गॅलॅक्सी टॅब एस१० एफई+ च्या लाँचची घोषणा केली, जे प्रीमियम टॅब्लेट डिझाइनवरील गॅलॅक्सी इकोसिस्टममध्ये नवीन डिवाईसेस आहेत. गॅलॅक्सी टॅब एस१० एफई सिरीजवरील आतापर्यंतची सर्वात मोठी स्क्रिन आणि डिस्प्लेला विस्तारित करणारे अत्यंत स्लिम बेझल्स असलेला गॅलॅक्सी टॅब एस१० एफई+ मनोरंजनापासून अभ्यास आणि दैनंदिन टास्क्सपर्यंत सर्व गोष्टींसाठी धमाल, सर्वोत्तम व्युइंग अनुभव देतो. सॅमसंगचे इंटेलिजण्ट फिचर्स वापरकर्त्यांना सहजपणे अधिक टास्क्स करण्यास सक्षम करतात, तसेच अत्यंत स्लिम डिझाइन वापरकर्त्यांना चालता-फिरता सर्जनशीलता व उत्पादकता संपादित करण्यास मदत करते.

''सॅमसंगमध्ये आम्ही प्रत्येकाला जागतिक दर्जाच्या नाविन्यतेचा अनुभव देण्याप्रती कटिबद्ध आहोत आणि नवीन गॅलॅक्सी टॅब एस१० एफई सिरीजच्या लाँचमधून तो दृष्टिकोन दिसून येतो. गॅलॅक्सी एआय क्षमता आमच्या एफई टॅब्लेट्समध्ये पदार्पण करत असताना आम्ही अत्याधुनिक तंत्रज्ञान पूर्वीपेक्षा अधिक सहजसाध्य करत आहोत. गॅलॅक्सी एस१० एफई सिरीज गॅलॅक्सी वापरकर्त्यांना त्यांची सर्जनशीलता व उत्पादकता वाढवण्यास सक्षम करेल आणि आम्हाला भारतातील टॅब्लेट सेगमेंटमधील आमचे बाजारपेठ नेतृत्व अधिक दृढ करण्यास मदत करेल,'' असे सॅमसंग इंडियाच्या एमएक्स बिझनेसचे उपाध्यक्ष आदित्य बब्बर म्हणाले.

आकर्षक डिस्प्ले

गॅलॅक्सी टॅब एस सिरीजच्या हेरिटेज डिझाइनला स्लिम बेझल्ससोबत एकत्र करत गॅलॅक्सी टॅब एस१० एफई+ चा १३.१-इंच डिस्प्ले स्क्रिनवर सर्वोत्तम मनोरंजनाचा आनंद देतो, जेथे हा डिस्प्ले पूर्वीच्या डिवाईसच्या तुलनेत जवळपास १२ टक्के मोठा आहे. ९० हर्ट्झ रिफ्रेश रेटद्वारे सक्षम सुलभ व्हिज्युअल्स आणि हाय ब्राइटनेस मोड (एचबीएम)मध्ये जवळपास ८०० नीट्सपर्यंत जाणाऱ्या व्हिजिबिलिटीच्या नवीन लेव्हल्स गॅलॅक्सी टॅब एस१० एफई व्हिडिओज पाहताना आणि गेमिंगचा आनंद घेताना सानुकूल व्युईंग अनुभवाची खात्री देतात. व्हिजन बूस्टरचे ऑटोमॅटिक ॲडजस्टमेंट्स बाहेरील बदलत्या वातावरणात देखील ब्राइटनेस व व्हिजिबिलिटी वाढवतात, तर ब्ल्यू-लाइट एमिशन्स डोळ्यांवर येणारा ताण कमी करण्यासाठी सुरक्षितपणे कमी करण्यात आले आहेत, जे प्रत्येक अद्वितीय व्युइंग गरजांची पूर्तता करतात.

प्रबळ कार्यक्षमता आणि वैविध्यपूर्ण डिझाइन

गॅलॅक्सी टॅब एस१० एफई सिरीज काम किंवा अभ्यास करताना उत्पादकता वाढवते आणि विनाव्यत्यय जलद, सुलभ गेमप्लेचा आनंद देते. परफॉर्मन्स अपग्रेड्स गॅलॅक्सी टॅब एस१० एफई सिरीज वापरकर्त्यांना प्रभावीपणे विविध ॲप्समध्ये स्विच होण्यास सक्षम करतात, ज्यामधून सुधारित मल्टीटास्किंगची खात्री मिळते. क्लासरूममधील किंवा कामाच्या ठिकाणी प्रत्येक क्षणांना कॅप्चर करायचे असल्यास नवीन अपग्रेड करण्यात आलेला १३ मेगापिक्सल रिअर कॅमेरा सुस्पष्ट व आकर्षक फोटो कॅप्चर करतो.

प्रबळ कामापासून विनासायास गेमिंग आनंदापर्यंत हे वैविध्यपूर्ण अनुभव वापरकर्त्यांना प्रत्येक ठिकाणी सुसज्ज करतात. पूर्वीच्या डिवाईसच्या तुलनेत ४ टक्के अधिक हलका असलेला गॅलॅक्सी टॅब एस१० एफई सहजपणे सोबत नेता येतो. गॅलॅक्सी टॅब एस१० एफई सिरीज विनासायास स्टोरेज देतो आणि स्लिम डिझाइनमुळे घरामध्ये, कॅम्पसमध्ये, कामाच्या ठिकाणी व इतरत्र सहजपणे वाहून नेता येतो. स्थिरता व टिकाऊपणासाठी डिझाइन करण्यात आलेली एफई सिरीज आयपी६८ रेटिंगसह येते.

# फिजिक्सवालाकडून जेईई ॲडवान्स्ड व नीट उमेदवारांसाठी पेगासस कोर्ससह ऑफलाइन ऑफरिंगचा विस्तार



**नागपूर, ५ एप्रिल :** फिजिक्सवाला (पीडब्ल्यू) या शिक्षण कंपनीने पेगासस कोर्स सुरू केला आहे. हा गतीशील अध्ययन प्रोग्राम जेईई ॲडवान्स्ड व नीट परीक्षांसाठी तयारी करणाऱ्या इयत्ता नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी डिझाइन करण्यात आला आहे. आता विविध निवडक शहरांसह नागपूर येथे उपलब्ध असलेला हा संरचित ऑफलाइन प्रोग्राम विविध वैशिष्ट्यांसह ऑलिम्पियाड प्रशिक्षण आणि समर्पित सराव व चाचणी टप्प्याच्या माध्यमातून लवकर तयारी करण्याची सुविधा देण्याचा प्रयत्न करतो.

पेगासस कोर्स विद्यार्थ्यांना स्पर्धेमध्ये मदत करण्यासाठी डिझाइन करण्यात आला आहे. विद्यमान अभ्यासक्रमाचे शिक्षण देण्यासोबत पुढील इयत्तेच्या अभ्यासक्रमाचा मोठा भाग समाविष्ट करत हा प्रोग्राम शैक्षणिक पाया घडवण्याचा प्रयत्न करतो. लहान बॅच आकारांचा वैयक्तिकृत अवधान देण्याचा मनसुबा आहे, जेथे शिक्षकांची टीम विद्यार्थ्यांना संरचित अध्ययन दृष्टिकोनाच्या माध्यमातून मार्गदर्शन करते. या कोर्समध्ये शैक्षणिक प्रगतीवर देखरेख ठेवण्यासाठी द्विसाप्ताहिक मूल्यांकन व ऑल इंडिया टेस्ट सिरीज (एआयटीएस) यांचा देखील समावेश आहे, तसेच या कोर्सचा संकल्पना दृढ करण्याचा आणि परीक्षा देण्याच्या धोरणांना अधिक सुधारित करण्याचा मनसुबा आहे. याव्यतिरिक्त, पेगाससमध्ये एनएसईजेएस आणि आयओक्यूएम यांसारख्या परीक्षांसाठी विशेषीकृत ऑलिम्पियाड वर्कशॉप्सचा समावेश आहे, ज्यांचा विद्यार्थ्यांची समस्या निवारण कौशल्ये अधिक निपुण करण्याचा उद्देश आहे.

पेगासस कोर्सची निर्णायक वैशिष्ट्ये म्हणजे त्यांची आठ महिन्यांची प्रखर उजळणी योजना, जी जेईई ॲडवान्स्ड आणि नीटसाठी तयारी करण्याकरिता विशेषरित्या डिझाइन करण्यात आली आहे. मार्गदर्शन, रिअल-टाइम शंका निरसन आणि परीक्षा-संबंधित धोरणांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी तयारी करण्याचा सर्वांगीण अनुभव मिळतो.

फिजिक्सवाला (पीडब्ल्यू)च्या ऑफलाइनचे सीईओ अंकित गुप्ता या प्रोग्रामबाबत आपला दृष्टिकोन सांगत म्हणाले, ''पीडब्ल्यूमध्ये आमचा विश्वास आहे की संरचित अध्ययन व लवकर तयारी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासामध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात. पेगासससह आम्ही मार्गदर्शन, सराव आणि अवधान केंद्रित शैक्षणिक वातावरणाच्या माध्यमातून मदत करण्याचा प्रयत्न करतो. आमचा दर्जेदार शिक्षण अधिक सहजसाध्य करण्याचा आणि विद्यार्थ्यांना आत्मविश्वासाने त्यांची स्वप्ने साकारण्यास सुसज्ज करण्याचा मनसुबा आहे.''

किफायतशीर व प्रभावी ऑफलाइन शिक्षणावर लक्ष केंद्रित करत पीडब्ल्यू अनुभवी शिक्षकवर्ग, नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धती आणि रिअल-टाइम विद्यार्थी सपोर्टला एकत्र करत अध्ययनामधील तफावत दूर करण्याचा प्रयत्न करत आहे, ज्यामुळे सर्वांगीण अध्ययन अनुभवाची निर्मिती होईल.

# पॉलीकॅब इंडियाने फॅन श्रेणीमध्ये आपली पकड मजबूत केली



**मुंबई, ४ एप्रिल :** इलेक्ट्रिकल सोल्यूशन्समधील आघाडीची कंपनी पॉलीकॅब इंडिया पंख्याच्या श्रेणीत आपली उपस्थिती आणखी मजबूत करत आहे. कंपनीने सुपर आरओआय फॅन्सची एक नवीन श्रेणी लाँच केली आहे, जी या श्रेणीमध्ये गुंतवणुकीवर परतावा (आरओआय) चे नवीन मानके स्थापित करेल. ही श्रेणी उत्तम कामगिरी, ऊर्जा कार्यक्षमता आणि आधुनिक डिझाइनचा परिपूर्ण संयोजन देते. वाढत्या ऊर्जेच्या किमती आणि ग्राहकांच्या बदलत्या पसंतींमुळे, पॉलीकॅब ग्राहकांना त्यांच्या पैशाचे चांगले मूल्य मिळावे यासाठी नाविन्यपूर्ण आणि नाविन्यपूर्ण उपाय प्रदान करण्यासाठी समर्पित आहे.

पॉलीकॅबचे सुपर आरओआय पंखे बीएलडीसी तंत्रज्ञानाने सुसज्ज आहेत, जे ५०% पर्यंत वीज वाचवण्यास सक्षम आहेत. त्याचे काही खास बीएलडीसी मॉडेल्स २५% अधिक एअर डिलिव्हरी देतात. रिव्हर्स रोटेशन वैशिष्ट्य हिवाळ्यातही आरामदायी वातावरण राखण्यास मदत करते. १००% तांब्याच्या वळणाच्या मोटरने बनवलेले हे पंखे बराच काळ टिकतात. या पंख्यांवर ४ वर्षांची वॉरंटी आहे. हे आधुनिक डिझाइनमध्ये ३० पेक्षा जास्त रंगांमध्ये उपलब्ध आहेत, जे तुमच्या घराची सजावट अधिक सुंदर बनवतात. सुपर आरओआय चाहते त्यांच्या ग्राहकांना कामगिरीवर परतावा, तंत्रज्ञानावर परतावा आणि उत्पादनावर परतावा देण्याचे आश्वासन देतात, ज्यामुळे ही गुंतवणूक एक स्मार्ट आणि फायदेशीर गुंतवणूक बनते.

वाढत्या मागणीला पूर्ण करण्यासाठी, पॉलीकॅबने फॅन श्रेणीमध्ये मोठी गुंतवणूक केली आहे. कंपनीने ९ दशलक्षाहून अधिक पंखे तयार करण्याची क्षमता असलेला एक अत्याधुनिक उत्पादन प्रकल्प उभारला आहे. या उत्पादन प्रकल्पाला प्रगत संशोधन आणि विकास केंद्राचे पाठबळ आहे. अशाप्रकारे, सखोल ग्राहक संशोधनावर आधारित उत्पादन प्रकल्पात सतत नवोपक्रम राबवले जातात आणि सर्वोत्तम उत्पादने प्रदान केली जातात.

या लाँचिंगप्रसंगी बोलताना, पॉलीकॅब इंडियाचे कार्यकारी अध्यक्ष आणि मुख्य व्यवसाय अधिकारी (बी२सी) ईशविंदर खुराणा म्हणाले, आजचे ग्राहक त्यांच्या घरगुती उपकरणांकडून अधिक अपेक्षा करतात. बदलत्या गरजा आणि वाढत्या ऊर्जेच्या किमतींमुळे, ६१% ग्राहक कामगिरी किंवा डिझाइनशी तडजोड न करता ऊर्जा कार्यक्षमतेला प्राधान्य देतात. ही मागणी ओळखून, पंखे पॉलीकॅब इंडियासाठी एक प्रमुख वाढीचे क्षेत्र बनले आहेत. आमच्या रुरकी प्लांटच्या यशानंतर, आम्ही हलोलमध्ये एक अत्याधुनिक उत्पादन सुविधा उभारली आहे, जी आमच्या विस्ताराला आणखी गती देईल. सुपर आरओआय पंखे पारंपारिक अपेक्षांपेक्षा खूप पुढे जातात आणि पॉलीकॅब इंडियाची नावीन्यपूर्णता आणि दीर्घकालीन फायदे प्रदान करण्याची आणि कालांतराने तुमच्या पैशाचे खरोखर मूल्य देणारे उपाय प्रदान करण्याची वचनबद्धता प्रतिबिंबित करतात.

सुपर आरओआय फॅन्स हे ग्राहकांसाठी एक स्मार्ट आणि शाश्वत पर्याय आहेत. ते आता आघाडीच्या रिटेल स्टोअर्स तसेच Amazon आणि Flipkart सारख्या ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मवर उपलब्ध आहेत. या लाँचसह, पॉलीकॅब ऊर्जा-कार्यक्षम गृह उपायांमध्ये आपले नेतृत्व स्थान आणखी मजबूत करत आहे, भारतीय घरांना उत्तम कामगिरी आणि मूल्य देत आहे.

# तेनाली रामा मालिकेत राजा चौधरीच्या एंट्रीमुळे नाट्य रंगणार



**मुंबई, ५ एप्रिल :** सोनी सबवरील तेनाली रामा मालिकेत तेनाली (कृष्ण भारद्वाज) या महान दरबारी कवी आणि चतुर रणनीतीकाराच्या वेधक गोष्टींनी प्रेक्षकांना खिळवून ठेवले आहे. आत्ता एका नवीन साम्राज्य आणि त्याचा सामर्थ्यशाली राजा चौडप्पा राया (राजा चौधरी) यांच्या एंट्रीमुळे कथानकाला एक जबरदस्त वळण मिळाले आहे आणि एका थरार नाट्याची सुरुवात झाली आहे.

कसलेला अभिनेता राजा चौधरी या मालिकेत चौडप्पा रायाच्या भूमिकेत दाखल होत आहे. तो केलाडी साम्राज्याचा समर्थ राजा आहे. त्याचा मोठा भाऊ थिरूमलाई राया (प्रदीप तिवारी) याच्या ऐवजी राजा म्हणून चौडप्पा रायाची निवड करण्यात आली आहे, पण लवकरच चौडप्पा रायाच्या शासनावर एका भयंकर शापाचे सावट येते. जो राज्यावर बसेल, त्याचा सर्वनाश होईल अशी कुजबुज राज्यात असते. यामुळे राज्यात घबराटीचे वातावरण पसरते. यावर तोडगा मिळवण्यासाठी आणि आपल्या शासनाला धोक्यात आणणाऱ्या नियतीच्या तावडीतून सुटण्यासाठी तो विजयनगरकडे निघतो. त्याच्या आगमनामुळे रहस्य, सामर्थ्य आणि चिकाटीची कथा उलगडू लागते.

तेनाली रामा मालिकेत राजा चौडप्पा रायाची भूमिका करणारा अभिनेता राजा चौधरी म्हणतो, पुन्हा एकदा तेनाली रामा मालिकेत काम करताना आनंद होत आहे. या आधीच्या अध्यायात मी एका सरदाराची भूमिका केली होती, आणि यावेळी राजा चौडप्पा रायाची एक अगदी वेगळी भूमिका मी करत आहे. ही एक जबरदस्त व्यक्तिरेखा आहे. राजा चौडप्पा राया एक न्यायप्रिय आणि धैर्यवान राजा आहे. पण त्याच्यासमोर असे आव्हान उभे आहे की, त्यापुढे त्याची ताकद आणि त्याचे शहाणपण देखील निष्प्रभ होत आहे. राज्याच्या सिंहासनावर आरूढ होणाऱ्या व्यक्तीला लागणाऱ्या तथाकथित शापाच्या सावटामुळे संपूर्ण साम्राज्य हादरले आहे. त्याच्यामागचे सत्य शोधण्याच्या मार्गात अनपेक्षित ट्विस्ट आहेत. ही व्यक्तिरेखा साकारण्याचा अनुभव खूप छान आहे. दुसऱ्यांदा तेनाली रामा मालिकेचा भाग होताना मी रोमांचित झालो आहे.

# जागतिकआरोग्यदिनी सोनी सबचे कलाकार शेअर करत आहेत व्यायामापासून ते वेलनेसपर्यंतच्या हेल्थ टिप्स


**मुंबई, ५ एप्रिल :** या जागतिक आरोग्य दिनी सोनी सबचे कलाकार- नवीन पंडिता, आरव चौधरी, प्रियंवदा कांत आणि आदित्य रेडिज आपला फिटनेस मंत्र सांगत आहेत. त्यांच्यासाठी आरोग्य हे ध्येय नाही, तर जगण्याची रीत आहे. अत्यंत धकाधकीची दिनचर्या असूनही आहार संतुलित ठेवण्यापासून ते आपल्या आरोग्याची काळजी घेण्याचे अभिनव मार्ग हे कलाकार शोधून काढतात. ते शारीरिक आरोग्याबरोबरच मानसिक आरोग्याला देखील तितकेच प्राधान्य देतात. त्यांची गोष्ट ऐकून आपल्याला जाणवते की वेलनेस ही तर नित्यनेमाने साधण्याची गोष्ट आहे. कणखर आणि प्रेरित राहण्यासाठी हे कलाकार काय करतात, हे त्यांच्याकडूनच ऐकू या!

पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत अश्विन पटेलची भूमिका करणारा नवीन पंडिता म्हणतो, माझ्यासाठी, फिटनेस म्हणजे समतोल! मी एक दिवसाआड वेट लिफ्टिंग करतो, आणि जेव्हा मी ते करू शकत नाही, तेव्हा तरीतरीत राहण्यासाठी किमान ८००० पावले चालण्याची काळजी घेतो. मला खायला आवडते, पण मी विचारपूर्वक खातो आणि शिस्त पाळतो. फिटनेस म्हणजे केवळ शारीरिक आरोग्य नव्हे! मानसिक शांती आणि स्थिरता म्हणजे देखील फिटनेस. त्यावर मी दररोज डोळसपणे मेहनत घेतो.

वीर हनुमान मालिकेत केसरीची भूमिका करणारा अभिनेता आरव चौधरी म्हणतो,फिटनेस सांभाळण्यासाठी शिस्त सर्वात महत्त्वाची आहे. विशेषतः अशा उद्योगात, जेथे कामाच्या वेळेला फारशी शिस्त नाही आणि लांबलचक शेड्यूलमुळे तुमचे शरीर थकते. त्यामुळे मी विचारपूर्वक आहाराची निवड करतो, केवळ जिभेचे चोचले न पुरवता मला ऊर्जा देतील असे पोषक पदार्थ निवडतो. तसेच हायड्रेटेड राहणे देखील फार महत्त्वाचे आहे. कारण त्यामुळे मी तरतरीत राहतो आणि आरोग्य चांगले राहते. शारीरिक आरोग्याबरोबरच मी पुरेसा आराम करण्याला देखील प्राधान्य देतो. कारण व्यायामाइतकीच रिकव्हरी देखील गरजेची असते. माझ्यासाठी, फिटनेस केवळ तो नाही, जो तुमच्या बाह्य रुपातून दिसतो. तर फिटनेस म्हणजे तुम्हाला शारीरिक आणि मानसिक दृष्ट्या आतून सक्षम वाटते. आणि त्याच्यामुळे मी दररोज माझे सर्वोत्तम देऊ शकतो.

तेनाली रामा मालिकेत शारदा ही भूमिका साकारणारी प्रियंवदा कांत म्हणते,फिटनेस हा दैनिक व्यायामापेक्षा वेगळा असतो. फिटनेस ही जीवन जगण्याची रीत आहे. अगदी धकाधकीच्या दिवशी केलेला छोटासा प्रयत्न देखील मौल्यवान असतो. तो प्रयत्न म्हणजे झटपट वर्कआउट असो, स्ट्रेचिंग असो किंवा चालणे असो, असा प्रत्येक क्षण योगदान देत असतो. केवळ शारीरिक सामर्थ्य नाही, तर विचारपूर्वकता महत्त्वाची आहे. मन आणि शरीर यांच्यात सुसंवाद असला पाहिजे. कारण मन शांत असले की ते शरीराला निरोगी ठेवण्यात मदत करते. क्रिएटिव्ह वर्कआउट करून मी व्यायामातील रोमांच जपते. त्यासाठी डान्सिंगपासून योग वगैरे करते. जेव्हा फिटनेस आनंददायक असतो, तेव्हाच तो तुम्हाला प्रेरित ठेवतो. माझ्यासाठी आरोग्य म्हणजे संतुलन शरीराचे पोषण करणे, योग्य प्रमाणात शरीराला आराम देणे आणि पडद्यावर किंवा पडद्याच्या मागे नेहमी तरतरीत, आनंदी राहणे.

तेनाली रामा मालिकेत राजा कृष्णदेवरायाची भूमिका करणारा आदित्य रेडिज म्हणतो, माझ्यासाठी फिटनेस म्हणजे केवळ कसरत नाही. फिटनेस म्हणजे अंतर्बाह्य तरतरीत वाटणे. शिस्त आणि नियमितता यांना मी पहिल्यापासून महत्त्व दिले आहे, जेव्हा फारसा उत्साह वाटत नाही, तेव्हाही. वर्कआउट आणि क्रिएटिव्ह हालचाली,



जशा की डान्स, हायकिंग किंवा सक्रिय जीवनशैली यांचे संतुलन साधण्याचा माझा प्रयत्न असतो. मानसिक आरोग्य देखील तितकेच महत्त्वाचे आहे. एक छानसा वॉक किंवा दीर्घ श्वसनाने देखील कधी कधी घडी नीट बसते. शेवटी, संतुलन हेच महत्त्वाचे- चांगली झोप, डोळस आहार आणि केव्हा आराम करायचा याची जाण.

# रामनवमीच्या पवित्र निमित्ताने झी टीव्हीवरील कलाकार सांगत आहेत ह्या उत्सवाच्या आपल्या काही सुंदर आठवणी

**मुंबई, ५ एप्रिल :** रामनवमीचा उत्सव हा अतिशय आध्यात्मिक महत्त्वाचा असून भगवान विष्णूचा सातवा अवतार आणि नीतिमत्ता, धैर्य आणि भक्तीचे प्रतीक असलेल्या भगवान श्रीरामचंद्रांचा हा जन्मोत्सव आहे. चैत्र नवरात्रीनंतर नवव्या दिवशी असलेला रामनवमीचा उत्सव देशभरात मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. यादिवशी भक्तगण उपवास करतात, मंदिराला भेट देतात आणि रामायणाचे पारायण करतात. हा उत्सव केवळ प्रार्थना किंवा आत्मपरीक्षण करण्याचा दिवस नसून पुरूषोत्तम रामाची सत्य, कर्तव्यदक्षता आणि करूणा ही मूल्ये आपल्या अंगी बाणवण्याचाही उत्सव आहे. मागच्या वर्षी अयोध्या येथे अतिशय भव्य आणि उत्कृष्ट अशा राम मंदिराची स्थापना पूर्ण झाल्यामुळे आता भक्तगणांसाठी ह्या उत्सवाला आणखी सखोल अर्थ लाभला आहे. ह्या खास निमित्ताने झी टीव्हीवरील कलाकार वसुधामधील अभिषेक शर्मा, कैसे मुझे तुम मिल गयेमधील पुलकित बांगिया, जागृतिएक नयी सुबहमधील रचना मिस्त्री, कुमकुम भाग्यमधील आर्ची सचदेव, जाने अनजाने हम मिलेमधील भरत अहलावत, जमाई नं.१ मधील अभिषेक मलिक आणि भाग्य लक्ष्मीमधील मेघा प्रसाद हे रामनवमीच्या आपल्या आठवणी आणि ह्यावर्षी ते हा सण कसा साजरा करणार आहेत त्याबद्दल सांगत आहेत.

झी टीव्हीवरील कैसे मुझे तुम मिल गयेमधील अबीरच्या भूमिकेतील पुलकित बांगिया म्हणाला, रामनवमी हा नेहमीच माझ्या परिवारासाठी अतिशय भक्तीभावाचा दिवस राहिलेला आहे. आम्ही घरी खास पूजेसह ह्या दिवसाठी सुरूवात करतो आणि भगवान श्रीरामचंद्रांच्या चरणी फुले आणि भोग प्रसाद चढवतो. लहान असताना आम्ही खास माझ्या आजीने बनवलेल्या रव्याचा शिरा आणि पूरी चणा यांचा खास प्रसाद खाण्यासाठी प्रतीक्षा करायचो. आजही मी निश्चितपणे मंदिरात जातो आणि स्वतःला आध्यात्मिक उत्सवामध्ये विलीन करतो. हा उत्सव आपल्याला भगवान राम यांच्या गुणांची आणि सत्य व नीतिमत्तेच्या मार्गावर चालण्याच्या महत्त्वाची आठवण करून देतो. मी सर्वांना ह्या शांतता, समृद्धी आणि आनंदाचा शुभेच्छा देतो. जय श्रीराम.

झी टीव्हीवरील वसुधामधील देवांशच्या भूमिकेतील अभिषेक शर्मा म्हणाला, रामनवमीचा सण नेहमीच माझ्या हृदयाच्या जवळ राहिलेला आहे. लहानपणापासून मी माझ्या परिवारातील सदस्यांना या दिवशी सकाळी लवकर उठून पूजा करताना आणि प्रसाद अर्पण करताना पाहिले आहे. ह्या दिवशी घरातील वातावरण अगदी भक्तीभावाने भरलेले असते. आम्ही भजने गातो आणि श्रीरामाचे आशिर्वाद घेतो. ह्यावर्षी मला अयोध्येतील राम मंदिराला भेट द्यायची होती आणि तेथील दैवी सोहळा अनुभवायचा होता पण माझ्या चित्रीकरणाच्या शेड्युलमुळे मला प्रवास करता येणार नाहीये. मात्र, मी श्रद्धेसोबत माझ्या पद्धतीने जोडला जातो फिल्म सिटीमध्ये वसुधाच्या सेटच्या मार्गावरच एक छोटेसे मंदिर आहे आणि मी त्याला सकाळी भेट देतो. मी सर्वांना शुभ आणि आनंददायी रामनवमीच्या शुभेच्छा देतो.

झी टीव्हीवरील जाने अनजाने हम मिलेमधील राघवच्या भूमिकेतील भरत अहलावत म्हणाला, राम नवमी हा नेहमीच माझ्या आणि माझ्या कुटुंबासाठी एक खास सण राहिला आहे. आम्ही आमचा उत्सव साध्या पद्धतीने साजरा करतो दिवसाची सुरुवात घरच्या लहानशा पूजेने होते, त्यानंतर रामायणाचे पठण करतो. माझ्या आईला मी प्रसादासाठी रव्याचा शिरा बनवताना लहानपणापासून उत्सुकतेने पाहत आलो आहे. लहानपणी तिला स्वयंपाकघरात मदत करायचा प्रयत्न करत असे, पण बहुतेक वेळा प्रसाद अर्पण होण्याच्या आधीच त्याचेच विष्ट घास चोरून खात असे! माझ्यासाठी हा दिवस केवळ धार्मिक विधींपुरता मर्यादित नाही; तो प्रभु श्रीराम यांच्या संयम, विनम्रता आणि धर्मनिष्ठा मूल्यांची आठवण करून देणारा दिवस आहे. भलेही आयुष्य आपल्याला कुठेही घेऊन जावो तरीही आपले पाय जमिनीवरच ठेवण्याची जाणीव करून देणारा दिवस आहे.


झी टीव्हीवरील जमाई नं.१मधील नीलच्या भूमिकेतील अभिषेक मलिक म्हणाला, राम नवमी हा दिवस नेहमीच माझ्यासाठी शांती आणि आत्मचिंतनाचा राहिला आहे. घरी आम्ही दिवसाची सुरुवात लहानशा पूजेने करतो, आणि माझी आई प्रसादासाठी तांदळाची खीर आणि रव्याचा शिरा बनवते हे असे पदार्थ आहेत जे मला त्वरित लहानपणात घेऊन जातात. मला अजूनही स्पष्टपणे आठवतंय, मी आजीच्या शेजारी बसून रामायणातील कथा ऐकत असे, धर्म आणि भक्तीचे मूल्य शिकवण्यासाठी तिने त्या मला सांगितल्या. त्या वेळी मला त्या कथांचा मतितार्थ पूर्णपणे समजला नव्हता, पण जसजसा मी मोठा होत गेलो, तसतसे त्यांचे जीवनाशी असलेले घट्ट नाते मला उमगले. आजही मी काही वेळ रामायणातील काही श्लोक वाचण्यासाठी किंवा श्रीरामांच्या गुणांवर चिंतन करतो. हा सण मला सतत ही आठवण करून देतो की जीवन कितीही कठीण झाले तरी योग्य मार्गावर चालणे नेहमीच अर्थपूर्ण ठरते.

झी टीव्हीवरील कुमकुम भाग्यमधील पायलच्या भूमिकेतील आर्ची सचदेव म्हणाली, राम नवमी नेहमीच माझ्या हृदयात एक विशेष स्थान राखून आहे. माझ्या शहरात चंदीगडमध्ये हा सण भक्ती आणि आनंदाने भरलेला असायचामंदिरांतून घुमणारे भजन, हवेत दरवळणारा ताज्या प्रसादाचा सुवास, आणि सकाळ-संध्याकाळ होणाऱ्या आरतीची उत्सुकता! मला अजूनही आठवतंय मी त्या गरमागरम पुरी, काळा चणा आणि गोड पदार्थांसाठी आतुरतेने वाट पाहायचे, जे गरम दुपारच्या वेळी आशीर्वादासारखे वाटायचे. आता मुंबईत या सणाची भव्यता अधिक मोठी असली, तरी त्याचा गाभा तोच आहे. मी कुठेही असले तरी हा सण मला त्या लहानपणीच्या सुंदर आठवणींमध्ये घेऊन जातो आणि घराच्या ऊब आणि अढळ श्रद्धेच्या निष्ठेची आठवण करून देतात.

झी टीव्हीवरील जागृतिएक नयी सुबहमधील जागृतिच्या भूमिकेतील रचना मिस्त्री म्हणाली, आपल्या समृद्ध सांस्कृतिक वेगळेपणासाठी मानल्या जाणाऱ्या मुंबईमध्ये लहानाची मोठी होताना रामनवमी कायमच माझ्यासाठी एक खास उत्सव राहिलेला आहे. मला आठवतंय आम्ही अतिशय सुंदर पद्धतीने सजवलेल्या मंदिरांना भेट द्यायचो, रस्त्यारस्त्यांवरून भक्तीपूर्ण गीते ऐकायचो आणि सेलिब्रेशनच्या वेळेस प्रचंड ऊर्जेचा अनुभव घ्यायचो. जागृतिएक नयी सुबहसाठीच्या चित्रीकरणात मी व्यस्त असले तरी मी त्यातून थोडा वेळ काढून ह्या पवित्र दिवशी भगवान श्रीरामचंद्रांचे आशिर्वाद घेईन. हा काळ भक्ती, आत्मपरीक्षण आणि सकारात्मकता पसरवण्याचा काळ आहे. मी माझ्या सर्व चाहत्यांना आनंददायी रामनवमीच्या शुभेच्छा देते हा दिवस तुमच्यासाठी शक्ती, शांतता आणि आनंद घेऊन येवो. जय श्रीराम.

झी टीव्हीवरील भाग्य लक्ष्मीमधील मलिष्काच्या भूमिकेतील मेघा प्रसाद म्हणाली, माझ्यासाठी रामनवमीचा दिवस हा नेहमीच भक्ती आणि एकत्रपणाच्या भावनेने भरलेला असतो. लहानपणापासूनच आमच्या घरी ह्या दिवशी प्रार्थना होताना आणि माझी आई भोग म्हणून सात्विक पदार्थ बनवताना आम्ही पाहत आलो आहोत. आमच्या घरी तेव्हा जे कोणी यायचे त्यांना तो भोग वाटायला मला फार आवडायचे आणि तो आमच्यासाठी अगदी खास क्षण असायचा. मला आठवतंय की ह्या दिवशीचे वातावरण आमच्या मनाला किती शांतता आणि स्पष्ट विचार प्रदान करायचे. आजही रामनवमीच्या वेळेस मी प्रार्थना आणि भोग अर्पण करण्याची परंपरा आजही पाळत आले आहे. ते केल्यामुळे मिळणारी शक्ती आणि शांतता यांचा विचारही मी करते. यामुळे आपल्याला ही आठवण होते की आपले आयुष्य कितीही व्यस्त झाले असले तरी थोडे थांबणे आणि कायम आपले पाय जमिनीवर ठेवल्याने मोठा फरक पडू शकतो. मी सर्वांना आनंददायी रामनवमीच्या शुभेच्छा देते.

# शब्दकोडे क्रमांक २०७६



**आडवे शब्द :-**


१) तुरुंग
६) लिहितावाचता येणारा
११) मऊ
१२) रुची
१४) लांबचा आप्तसंबंध
१६) एक जुनी लेखणी
१८) अकारण
१९) वाकणे, वाकण्याची क्रिया
२०) पर्जन्य
२१) कौतुक
२४) अस्वस्थता, तडफड
२६) बारा वर्षांचा काळ
२८) एक पर्वत
३०) उपभोगण्यास अयोग्य
३१) मिंधा
३२) संरक्षक भिंत
३३) विरोध
३५) आठवण
३६) मीठ
३८) चांदी
४०) म गांधीजींचे नाव
४३) रागीट
४५) ओटा, कट्टा
४७) वीरमरण
४९) सोपा, उसाच्या चरकाचे वरचे तकट
५१) वाळपट
५२) मोजकेपणा, मितता
५४) गावातील जुनी वस्ती
५६) रक्कम
५८) पाणी
५९) हिंदीत धडा
६०) अंगमेहनत
६५) दुर्दशा
६३) मोठ्ठी गंमत, मौज
६४) बांबू
६५) दह्याचे पातळसर पेय
६६) दमणे
६८) डोंगर
६९) चित्रपटाचा पडदा
७२) हिंदीत शपथ
७३) गाणे
७४) अपशकुन
७६) रणांगण
७७) दृष्टी
७८) किंवा
७९) सैन्यदल

**उभे शब्द :-**

१) बेलाशक, बेफिकीरपणे
२) पुरुष
३) उचल्या, भुरट्चोर
४) टिंगल
५) मांडणी
७) जैन साधू
८) दांत
९) राजा हरिश्चंद्राची पत्नी
१०) घर
१३) वकिलाचे काम
१५) रम्य
१७) ललाट
१८) विसराळू
२२) कोळशाचे दुकान
२३) उणीव
२५) भ्रमर
२७) पळून जाणे
२९) केसांची बट
३३) तडीपार
३४) तरतूद
३५) च्या बरोबर
३७) चाटून खाण्याचे (औषध)
३९) होडी
४०) मुक्ता, शिंपल्यातील रत्न
४१) काकुळतेने याचना करणे
४२) मनाला टोचणारे दुःख
४४) उच्च, श्रेष्ठ
४६) चंद्र
४८) कल्ला, गडबड
५०) प्राणान्तिक वेदना
५३) दुसरा, अन्य
५५) प्रभात
५७) श्रम, मेहनत
५९) पूर्ण ऐक्य,
६१) छिद्र
६३) कोथिंबीरीचे बी
६४) काठ, बाजू
६५) थाळी
६७) वाळवी
६८) प्रस्थान करणे
७०) पडदा
७१) वाळा
७२) न्यून
७३) शीतल
७५) किंमत

(उत्तर उद्याच्या अंकात)

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**



# भक्तिमार्ग

# रामनामाचा गजर रंगे!

चैत्र मासाचा आरंभ हा अनेक अर्थांनी महत्त्वपूर्ण आहे. घरोघरी स्थानापन्न होणारी चैत्रागौर, रामाच्या नवरात्राचा प्रारंभ, त्यानंतर येणारी रामनवमी अशा मंगलमय दिवसांची रेलचेल असणारा हा महिना भक्तिमय वातावरणाची निर्मिती करुन जातो. राम हे उभ्या भारतवर्षाचं दैवत आहे. रामाचं जीवनचरित्र माणसाला माणूस म्हणून जगणं शिकवणारं आहे. तो मर्यादा पुरुषोत्तम आहे. पूत्र, पिता, बंधू, सखा म्हणूनही तो आदर्श आहे. आजही देशाच्या कानाकोपऱ्यात रामनामाचा गजर घुमतो. राम राज्य आणण्याची आश्वासनं देतं राजकीय शक्ती



सत्ता हस्तगत करतात. रामाचं चरित्र, त्याच्या गोष्टी ऐकूनच नवी पिढी सुसंस्कृत आणि सुजाण होते. श्रीरामासारखा पुरुषोत्तम युगायुगातून एकदाच जन्माला येतो. पुरुष असावा तर तो रामासारखा... असा सत्यवचनी, आदर्श पुरुषोत्तम पुन्हा पुन्हा जन्म घेत नाही. रामजन्माचा सोहळा म्हणजे आनंदाला बहरच येतो जणू. मंदिरांमध्ये, घराघरांतून दुपारी बरोबर बारा वाजता रामजन्माचा सोहळा आनंदात साजरा केला जातो. श्रीरामाच्या मंदिरातला हा सोहळा तर फारच प्रेक्षणीय असतो. विशेषत: स्त्रीवर्गात उत्साहाला उधाण आलेलं असतं. रंगीत भरजरी साड्या नेसून, आभूषणे मिरवत, केसांत गजरे माळलेल्या सर्व वयोगटातल्या स्त्रिया रामजन्माचा सोहळा मोठ्या थाटामाटात साजरा करतात.

देवळात मध्यभागी रंगीत पाळणा सुवासिक, रंगीबेरंगी फुलांनी सजवलेला असतो. त्याची दोरीसुद्धा फुलांनी, झिरमिळ्यांनी वेढलेली असते. देवळातल्या रंगीबेरंगी पताका आणि खांबावर सोडलेल्या फुलांच्या माळांमुळे देवळाच्या मंगल वातावरणात भर पडते. बहुतेक ठिकाणी रामजन्माच्या अगोदर तास, दोन तास आधी प्रभू रामचंद्रावर कीर्तन सुरु होतं. त्यासोबत कौसल्यामातेच्या डोहाळ्यांवरची मधुर गाणी गायली जातात. राम जन्माची वेळ झाली की दुपारी बारा वाजता, देवळात सजवलेल्या पाळण्यात प्रभू रामचंद्रांची मूर्ती ठेवली जाते. पाळण्याची दोरी हलक्या हातांनी मागे-पुढे करत, पाळण्याला झोके देत रामजन्माची गाणी म्हणतात! ङ्कराम जन्मला गं सखी, राम जन्मलाङ्खङ्ख हे रामजन्माचं गाणं अत्यंत लोकप्रिय आहे. प्रत्येक ठिकाणी मंदिरांमधून हे गाणे मोठ्या आवाजात लावलं जातं. त्यातील आनंदाच्या वात्सल्यपूर्ण भावना आणि मंदिरातल्या पाळण्याची दोरी हलवणाऱ्या सुवासिनी यांचा दृष्यमेळ पाहणाऱ्याच्या मनात आनंदलहरी उठवून जातो. खरंच परम `श्वररुपी राम माणसांत जन्माला आला आहे की काय, असा मंगलमय भास होतो. त्यावेळी त्या सुखाचा अनुभव प्रत्येक भाविक घेत असतो. म्हणून रामजन्माच्या सोहळ्याची पूर्वापार आवड उत्सवाच्या निमित्ताने आजही जोपासली जाते.

रामजन्मानंतर मोठ्या आनंदात उपस्थितांना प्रसाद म्हणून सुंठवडा आणि साखरफुटाणे वाटले जातात. विविध सण वेगवेगळ्या प्रकारे, आनंद घेत साजरा करण्याची परंपरा भारताइतकी कुठेही समृद्ध नसेल. प्रत्येकच देवदेवतेचा सण वेगवेगळ्या पद्धतीने साजरा होतो. प्रभू रामचंद्रांबद्दल भारतीयांना अमर्याद आत्मियता आहे. याचं मूळ कारण म्हणजे प्रत्येकाला चराचराचा कारभार निर्वेध चालावा असं वाटत असतं. किंबहुना तशी प्रत्येक सजीवाची इच्छा असते. जगात सर्व काही छान चालावं, आदर्शवाद समोर ठेवून जगरहाटी पुढे चालावी, न्यायाचं दान सर्वांच्या पदरात सारखंच पडावं आणि त्यासाठी संरक्षण देणारा दयाळू आणि प्रेमळ राजा असावा, अशी सर्वसामान्यांना आशा असते. असा एक राजा एके काळी अस्तित्वात होता असं रामायणातल्या कथांमधून, ग्रंथांमधून स्पष्ट झालं आणि प्रत्येक माणूस त्या राजापुढे मनोमन नतमस्तक झाला. त्याच्या चरणस्पर्शासाठी अधीर झाला. अयोध्येचा राजा प्रभू रामचंद्र प्रत्येक भारतीयाच्या हृदयसिंहासनावर कायमचा आरुढ झाला.

काय नव्हतं या अलौकिक शक्तीशाली राजाच्या व्यक्तिमत्त्वामध्ये? त्रेतायुगामध्ये कौसल्याराणीच्या पोटी जन्मलेला हा पुत्र महापराक्रमी होता. वसिष्ठ ऋषींच्या आश्रमातल्या यज्ञात अडथळा आणू पाहणाऱ्या राक्षसांचा त्याने कुमारवयात असतानाच संहार केला. त्याच वेळी प्रभू रामचंद्रांच्या पराक्रमी गुणाची ग्वाही पिता दशरथ राजाला मिळाली होती. वास्तविक प्रभू रामचंद्र हा दशावतारांमधला पाचवा अवतार मानला जातो. पृथ्वीवर एखाद्या दुष्ट शक्तीचं अराजक माजलं तर ईश्वर वेगवेगळ्या रूपात अवतार घेऊन दुष्टांचा विनाश करतो. तसंच प्रभू रामचंद्रांनीही लंकेचा उन्मत्त राजा रावण याचा संहार करण्यासाठी जन्म घेतला अशी कथा सर्वश्रुत आहे. मुलावरील अपार विश्वासापोटी दशरथाने प्रभू रामचंद्रांवर राज्यकारभार सोपवला होता. पण त्याच जनतेने त्यांची प्राणप्रिय पत्नी सीतामाईच्या चारित्र्याला बोल लावलं तेव्हा तो जनतेवर किंचितही रागावला नाही; उलट जनतेच्या मनातील न्यायदानाची भावना सुरक्षित रहावी यासाठी त्याने प्रिय पत्नीचाही त्याग केला! जनतेसाठी स्वत:च्या सुखाचा त्याग करणारा राजा पुराणांत दुसरा नाही. एक माणूस म्हणून जन्माला आल्यावर या ईश्वराने माणसाच्या आदर्शवादाच्या मर्यादा प्रसंगी जीवाचं, सर्व सुखांचं मोल देऊन सांभाळल्या. म्हणून माणसातल्या या सर्वोत्तम पुरुषाला ङ्कमर्यादा पुरुषोत्तमङ्ख हा सन्मान मिळाला.

**भक्ती कथा**

हा राजा इतका गुणी असूनही संसारसुखापासून



वंचित राहिला. पत्नीविरहाचं दु:ख त्याने अबोलपणे सहन केलं. ज्योतिषविद्येच्या दृष्टीने असं म्हणतात की, प्रभू रामचंद्रांच्या जन्माच्या वेळी सूर्य मेष राशीत नवव्या स्थानावर असल्यामुळे प्रभू रामचंद्रांना गृहसौख्य मिळालं नाही. सूर्य दहाव्या स्थानात असता तर रामाला हे सुख मिळालं असतं. असा एकवचनी, एकपत्नी आणि एकबाणी राम अत्यंत लोकप्रिय असूनही त्याला वनवासात जावं लागलं. माता कैकयी सावत्र असूनही तिच्या एका शब्दाच्या आदेशानुसार त्याने तत्क्षणी वनवासाची वाट धरली. त्यावेळीही त्याने कैकयी मातेला किंचितही दूषण न देता पित्याची समजूत काढली. प्रत्येक वेळी रामाच्या चरित्रात ही गोष्ट प्रकर्षाने जाणवते की, स्वत:च्या दुर्दैवी आयुष्याबद्दल त्याने कधीही कोणालाही बोल लावलं नाही; उलट स्वत:चं प्रारब्ध समजून प्राप्त परिस्थितीचा आनंदाने स्वीकार केला. विशाल मनाची अन् सहनशीलतेची दिव्य प्रतिमाच जणू ती!

आजची सामाजिक परिस्थिती लक्षात घेता रामचरित्राच्या अभ्यासाची गरज प्रकर्षाने जाणवते. आज बहकलेल्या तरुणाईला तत्त्वनिष्ठ रामाच्या आयुष्याचा आदर्श पुढे ठेवण्याची आवश्यकता आहे. जवळ संपत्ती असली की नशेच्या आहारी जाऊन, माता-पित्यांना बदनाम करणाऱ्या तरुणांना प्रभू रामचंद्रांच्या माता-पित्यांप्रती प्रेमाचं उदाहरण द्यायला हवं. आपल्या व्यसनाधिन आयुष्याने आई-वडिलांना चिंतेत टाकणाऱ्या या पिढीला, माता कैकयीच्या एका आज्ञेखातर वनवासात जाणाऱ्या रामाची गोष्ट सांगायला हवी. आई-वडिलांची आज्ञा पाळणं हे मुलांचं कर्तव्य, त्यांचा शब्द मोडणं म्हणजे पाप हे समजून घ्यायला हवं. कारण आई-वडील सांगतात ते हिताचंच असतं, याचा प्रत्यय आल्याशिवाय रहात नाही!

म्हणतात ना, कैकयीला रामाला वनवासात पाठवण्याची बुद्धी का झाली? तर त्यानंतर वनवासातील सीताहरणाची घटना घडून त्या निमित्ताने रावणाचा विनाश व्हावा, असा ईश्वरी संकेत होता. हे नाट्य ईश्वरानं घडवलं.

रामकथेतील बंधूप्रेमाच्या कहाणीचा गोडवाही अवीट आहे. भरताला राज्यभिषेकाचा आग्रह करून, प्रभू रामचंद्रांनी भावंडावर किती प्रेम करावं याचा दाखलाच दिला आहे. आज संपत्तीच्या वाटणीवरून भावाभावांमध्ये दुरावा निर्माण झालेला दिसतो. कित्येकदा तर मारामाऱ्या, खुनापर्यंत मजल जाते. अशा वेळी रामायणातल्या बंधूप्रेमाचा आदर्श स्वीकारण्यात आपण कितपत यशस्वी झालो, असा प्रश्न पडतो. रामायणासारखे आदर्शवादी ग्रंथ पूजनीय म्हणून केवळ डोक्याला लावून नमस्कार करणं पुरेसं नाही. त्यातला आदर्शवाद प्रत्यक्षात आणणं हीच त्या ग्रंथाची खरी पूजा ठरेल. अशा आदर्शवादाची आठवण ठेवण्यासाठीच साजरा करावा हा रामनवमीचा उत्सव !

## मिळेल सुयोग्य जोडीदार

प्रत्येक माणसाच्या आयुष्यात नातेसंबंधांना खूप महत्त्व असतं. त्यातही सुयोग्य जोडीदार मिळाला की आयुष्य सुसह्य होतं. एकमेकांची सोबत, आचारविचार, सवयी आवडू लागल्या की आयुष्याचा हा प्रवास सुखकर होतो. पण नात्यामध्ये दुरावा निर्माण झाला किंवा



जोडीदाराशी पटत नसेल तर आयुष्य ओझं वाटू लागतं. प्रत्येकाला गरज असते ती प्रेम, जिव्हाळा आणि आपुलकीची. हे सगळं आपण जोडीदारात शोधत असतो. म्हणूनच आपल्याला समजून घेणारा, इच्छांचा मान राखणारा जोडीदार मिळणं भाग्याचं मानलं जातं. प्रत्येकात गुणदोष असले तरी त्यांचा स्वीकार करून एकमेकांचं मन जपायचं असतं. योग्य जोडीदार मिळवण्यासाठी फेंगशुई शास्त्रात काही उपाय सांगितले आहेत.

**वास्तू**

* प्रेमळ जोडीदाराच्या शोधात असाल तर घरात लाल रंगाला महत्त्व द्या. भिंतींना लाल रंग देता येईल. घरात लाल रंगाचा पलंग ठेवता येईल. लाल रंगाची चादर, उशी यांचा वापर करता येईल. लाल रंगाची चित्रंही लावता येतील. दक्षिण कोपऱ्यातील बहुसंख्य वस्तू लाल रंगाच्या असाव्या. दक्षिणेकडे लाल रंगाचा दिवाही ठेवता येईल.
* दक्षिण-पश्चिम हा नातेसंबंधांचा कोपरा मानला जातो. त्यामुळे या कोपऱ्यात बाथरूम, स्वच्छतागृह असू नये. या कोपऱ्यात स्वच्छतागृह असल्यास जोडीदारासोबत पटणार नाही. या कोपऱ्यात प्रेमाचं प्रतीक असणारे पक्षी किंवा मेंडरिन डक ठेवता येईल. या कोपऱ्यात भरपूर प्रकाश असावा. लाल रंगाच्या दोन मेणबत्त्याही ठेवता येतील.
* घरात असतानाचा जास्तीत जास्त काळ पश्चिम कोपऱ्यात घालवण्याचा प्रयत्न करा. याचा सकारात्मक परिणाम जाणवू लागेल.



आपलं आयुष्य सोपं नाही. प्रत्येकालाच विपरित परिस्थितीचा सामना करावा लागतो. प्रत्येकाचा संघर्ष वेगळा असला तरी आयुष्याची लढाई प्रत्येकाला आपापलीच लढावी लागते. पण संघर्षाला कधीही दुर्दैव मानू नका. पळ काढू नका. संघर्षास सामोरं जाणाऱ्याला हमखास यश मिळतं. यशोशिखरावर असलेले अनेक लोक आपल्याला दिसतात. पण हे यश त्यांना सहजासहजी मिळालेलं नसतं. त्या यशामागे संघर्ष, मेहनत, परिश्रम असतात. अनेकांनी अवहेलना झेललली असते. नकार पचवलेले असतात. या सगळ्यांमधून तावून सुलाखून निघाल्यानंतरच यश मिळतं. परिस्थिती चांगली की वाईट हा मुद्दा नसतो तर बेतलेल्या प्रसंगाचा आपण कसा सामना करतो, हे महत्त्वाचं असतं.

## संघर्ष करा सोपा

संघर्ष करताना मानसिक संतुलन आणि मनाची प्रसन्नता ढळू देऊ नका. आतून खूश रहा. यामुळे संघर्षास सामोरं जाण्याचं बळ मिळेल. आपण मनातून आनंदी राहू तेवढे मोकळे होऊ. आतून मोकळे झालो की बाहेरचा दबाव, तणाव यांचा कोणताही परिणाम होत नाही. रामायणातल्या एका घटनेतून आपल्याला प्रेरणा घेता येईल. सीतेला रावणाच्या तावडीतून सोडवण्यासाठी लंकेला जाण्याचं मोठं आव्हान श्रीराम आणि त्याच्या वानरसेनेपुढे होतं. एवढा मोठा समुद्र पार करायचा तरी कसा, असा प्रश्न पडला होता. श्रीराम म्हणजे विष्णूचा अवतार... पण या विवंचनेत त्यांनाही ग्रासल होतं. त्यावेळी हनुमानाच्या वक्तव्यामुळे सगळा ताण दूर निघून गेला.

*सुनि अति उकुती पवनसुत केरी।*
*हरषे कपि रघुपति तन हेरी।*

असं हनुमान म्हणतो. त्याआधी हनुमान सांगतो, तुम्ही एकदा अग्नीचं मस्तक कापून समुद्रात टाकलं होतं. यामुळे समुद्र आटला होता. समुद्राच्या पत्नीच्या अश्रूंमुळे तो पुन्हा भरला. त्यामुळे समुद्राचं पाणी खारं झालंय. असं वक्तव्य करून हनुमानाने रामाला आपल्या शक्तीची जाणीव करून दिली. तसंच वानरसेनेचा आत्मविश्वासही वाढवला.

**सेल्फ हेल्प**

आयुष्यात संघर्षाचे अनेक प्रसंग येतात. पण कोणत्याही परिस्थितीत आपला आनंद हरवू देऊ नका. मळूळ स्वभावाला बगल देऊ नका. नेहमी आनंदी रहा. खुशीत जगा आणि संघर्ष करा. यामुळे यश तुमचंच असेल. त्यामुळे संघर्ष वाट्याला आला तरी दु:खी-कष्टी होऊ नका. त्याचा प्रभावीपणे सामना करा.

## कोणाशी असावं नात?

माणूस हा समाजप्रिय प्राणी आहे. कोणताही माणूस एकटा राहू शकत नाही. त्याला माणसांच्या सोबतीची गरज लागतेच. आपल्या आसपास माणसं असतात. कुटुंब, मित्रपरिवार, सहकारी, आवडत्या-नावडत्या व्यक्ती असं बरंच काही असतं. माणसाच्या जन्मासोबतच त्याला एक नाव मिळतं. जन्मानिशी विविध नाती तयार होतात. ही माणसं आपल्या आयुष्याचा अविभाज्य भाग बनून जातात. कोणाच्या पोटी जन्म घ्यायचा हे आपल्या हातात नसतं. नाती ही आपसूक तयार होतात. पण मित्रमंडळी, जोडीदार यांची निवड करण्याची संधी आपल्याला मिळते. आयुष्यात आलेल्या माणसांवर बरंच काही अवलंबून असतं. त्यामुळे आपल्या आसपास योग्य माणसांचा गोतावळा असला पाहिजे. योग्य माणसांची निवड कशी करायची याबाबत आर्य चाणक्यांनी सांगून ठेवलंय. त्यांचे हे सल्ले आजच्या जगातही लागू पडतात.

**धर्म नीती**

* नोकर आणि कर्मचाऱ्यांची परीक्षा त्यांच्या हातात कोणतंही काम नसताना पाहावी. कठीण प्रसंगांमध्ये नातेवाईकांची परीक्षा घेता येते. अडचणीत असताना मित्रांची ओळख पटते. तर आर्थिक अडचणीत असताना जोडीदाराची परीक्षा असते.
* खऱ्या मित्रांची पारख अडचणीच्या काळात होते. आयुष्यात आपली वाटणारी माणसं वेळेला मागे हटतात तर आयुष्यभर ज्यांच्याकडे दुर्लक्ष केलं जातं अशी माणसं ध्यानीमनी नसताना मदतीला धावून येतात.



अशा माणसांना आयुष्यात स्थान दिलं पाहिजे.
* तुमच्याकडून सतत अपेक्षा करणाऱ्यांसोबत फार संबंध ठेऊ नका. अशा लोकांशी मैत्रीही करू नका. आपल्यापेक्षा हुद्याने कमी किंवा वरचढ असलेल्या लोकांपासूनही लांब रहा. आचारविचार आणि वागणुकीतल्या तफावतीमुळे वाद होत राहतील. यामुळे नातेसंबंध टिकून राहणार नाहीत.

## इच्छापूर्तीसाठी...

हिंदू धर्मात ३३ कोटी देवीदेवता आहेत. प्रत्येक देवतेचा संबंध ठराविक गोष्टीशी किंवा इच्छेशी असतो. गणपती ही बुद्धीची देवता आहे तर लक्ष्मी धन आणि समृद्धीची देवता आहे. प्रत्येक देवता भक्तांच्या सगळ्या इच्छा पूर्ण करते. पण यासाठी भक्तांनीही मनोभावे पूजा करावी लागते. देवतेला प्रसन्न करुन घेण्यासाठी काही उपाय करावे लागतात. इच्छा पूर्ण करण्यासाठी कोणत्या देवाची कशी आराधना करावी, याविषयी जाणून घेऊ या...





* कुबेर ही धनाची देवता आहे. अडकलेला पैसा परत मिळवण्यासाठी देवघरात उत्तर दिशेला कुबेराची मूर्ती किंवा फोटो ठेऊन नियमित पूजा करून दिवा लावावा.
* नातलगांकडून प्रेम प्राप्त करण्याची इच्छा असेल तर देवघरात श्रीकृष्णाची मूर्ती ठेऊन पूजा करावी.
* आजारांपासून मुक्ती हवी असेल तर सूर्यदेवाची आराधना केली पाहिजे. देवघरात सूर्याची मूर्ती किंवा फोटो ठेऊन पूजा करावी.
* उद्योग व्यवसायात प्रगती करायची असेल तर गणपतीची पूजा करावी.
* ज्यांना भीती वाटत असेल किंवा वाईट स्वप्न पडत असतील त्यांनी हनुमानाची पंचमुखी मूर्ती स्थापित करून पूजा करावी.
* उत्पन्नात वाढ होण्याची इच्छा असेल तर देवी लक्ष्मीची आराधना केली पाहिजे.
* नोकरीत बढती हवी असेल तर श्रीविष्णूची आराधना करावी. विष्णूसोबत श्रीलक्ष्मीची पूजा करणं अधिक लाभदायी ठरतं.
* परीक्षेत यश हवं असेल तर देवी सरस्वतीची आराधना करावी. सरस्वतीच्या मूर्तीपुढे दररोज दिवा लावावा.
* कुटुंबातले वाद, मित्रांसोबतची भांडणं मिटवायची असतील तर शंकराची आराधना केली पाहिजे.
* घरातल्या सदस्यांमध्ये प्रेम, आपुलकी आणि जिव्हाळा टिकवून ठेवायचा असेल तर घरात श्रीराम, लक्ष्मण आणि सीतेची मूर्ती ठेवायला हवी.

**जाणून घ्या**

## जमलू ऋषींचं अनोखं मंदिर



हिमाचल प्रदेशात मलाणा नावाचं एक गाव आहे. या गावात जमलू ऋषींची पूजा केली जाते. मलाणा हे अत्यंत प्राचीन गाव असून या गावात जमलू ऋषींचा वास असल्याचं इथले रहिवासी मानतात. इथल्या लोकगीतांमध्येही जमलू ऋषींचा उल्लेख होतो. जमलू ऋषी परशुरामाचे पिता... जमलू ऋषींमध्ये विष्णूचा अंश असल्याचं इथले लोक मानतात. या गावात जमलू ऋषींचं मंदिर असून इथे भाविक मोठ्या संख्येने येतात. जमलू ऋषींचं मंदिर अनोख्या पद्धतीने बांधण्यात आलंय. या मंदिराच्या निर्मितीसाठी लाकूड आणि दगडाचा प्रभावी वापर करण्यात आलाय. या मंदिरात जमलू ऋषींची सोन्याची मूर्ती आहे. सत्ययुगातले जमदग्नी म्हणजे जमलू ऋषी अशी इथली मान्यता आहे, त्यामुळे या ऋषींना मानाचं स्थान आहे.

**तीर्थक्षेत्र**

इथे जमलू ऋषींना देवत्व देण्यात आलंय. हे ऋषी भाविकांच्या समस्या, दु:ख दूर करतात अशी गावातल्या लोकांची श्रद्धा आहे. त्यांनी गावातल्या लोकांना मदत केली आहे. अडचणीच्या प्रसंगी जमलू ऋषी ग्रामस्थांच्या पाठीशी उभे राहतात, अशी त्यांची श्रद्धा आहे. इथे पिकांची कापणी केली की धान्याचा एक भाग जमलू ऋषींना अर्पण केला जातो. या धान्याचा वापर विविध महोत्सवांदरम्यान केला जातो. या मंदिराशी संबंधित आख्यायिका सांगितली जाते. ती म्हणजे जमलू ऋषींना तपश्चर्या करण्यासाठी शांत स्थान हवं होतं. अशा स्थानाच्या शोधात असताना ते मलाणा गावात आले. हे गाव त्यांना आवडलं आणि इथेच तपश्चर्या करू लागले. जमलू ऋषी गावातले न्यायनिवाडेही करतात. त्यांना कौल लावला जातो. आपल्या शिष्यांच्या मुखातून ते समस्यांवर उपाय सांगतात. जमलू ऋषींनी सांगितलेले उपाय, केलेला निवाडा गावकरी मान्य करतात.

## आधारातून आत्मविश्वासाकडे

मिळालेल्या आधाराचा वापर कसा करायचा हे सर्वस्वी संबंधित व्यक्तीवर अवलंबून असतं. आधारामुळे माणूस आळशी, अक्षम आणि अहंकारी बनू शकतो तर दुसरीकडे तो मेहनती, ध्येयवादीही होऊ शकतो. आधाराकडे कसं बघायचं हा ज्या त्या व्यक्तीचा दृष्टीकोन असू शकतो. छोट्याशा बीजाला पाणी घातलं, खतं घातली की त्याचं रूपांतर मोठ्या वृक्षात होतं. या झाडावर गोड, रसाळ फळं लागतात. दुसरीकडे एखाद्या वृक्षाला विषारी फळं लागतात. आता आधाराच्या नकारात्मक बाजूकडे दुर्लक्ष करायचं ठरवलं तर आधारामुळे माणसाला प्रेरणा मिळू शकते. जगण्याला नवा अर्थ मिळू शकतो. यासाठी आपण एक उदाहरण पाहू या. निराश आणि हताश झालेल्या युवकाला पाहून एक वयस्कर व्यक्ती त्याच्याजवळ आली. त्याला निराश होण्याचं कारण विचारलं. भागीदाराने आपली फसवणूक केली असून व्यवसायात खूप नुकसान झालं असल्याचं त्या तरूणाने सांगितलं. हे ऐकल्यावर त्या माणसाने पाच लाख रूपयांचा धनादेश त्या तरूणाच्या हाती दिला. हे पाहून तरूणाला खूप आश्चर्य वाटलं. धनादेश देताना त्या माणसाने तरूणाला एक अटही घातली. खूप गरज असेल तेव्हाच या पैशांचा वापर कर, असं त्याने सांगितलं.



अनोळखी व्यक्तीकडून मिळालेल्या या आधारामुळे तरूण खूप खूश झाला. त्याने उत्साहाने कामाला सुरूवात केली. व्यवसायात प्रगती करायला सुरूवात केली. त्याचा उत्साह दुपटीने वाढला होता. या तरूणाला उद्योगातल्या खाच-खळग्यांची जाण होती. यामुळे तो पुन्हा उभा राहिला. वयस्कर व्यक्तीने दिलेल्या धनादेशामुळे त्याला मोठा आधार मिळाला होता. व्यवसायात यश मिळाल्यानंतर त्याला धनादेशाची आठवण झाली. आपल्याला मदत करणाऱ्या माणसाला भेटून कृतज्ञता व्यक्त करावी असं वाटल्याने तो त्याचा शोध घेऊ लागला. त्या माणसाचं निधन झालं असल्याचं त्याला कळलं. तरूणाला हळहळ वाटली. तो माणूस मनोरूग्ण होता आणि प्रत्येकाला अशा प्रकारे धनादेश देत असल्याची माहिती तरूणाला मिळाली. त्या माणसाच्या खात्यात एवढे पैसेही नव्हते. पण त्याच्या एका कृतीने अनेकांना नवा आत्मविश्वास मिळाला. अनेकांचं आयुष्य घडलं.

मदतीची गरज असणारे असंख्य लोक आपल्या आसपास आहेत. अनेक तरूणांमध्ये गुणवत्ता आहे, त्यांना पुढे जायचंय. लहानग्यांना शिकायचंय. पण सोयीसुविधा आणि आधार नसल्याने ते चाचपडत आहेत. अशा लोकांना आधार देण्याचं, त्यांना प्रेरणा देण्याचं काम आपण करू शकतो. आपल्या छोट्याशा आधाराने एखाद्याचं आयुष्य घडू शकतं. म्हणूनच अशा लोकांचा शोध घेऊन त्यांना मदत केली पाहिजे. एखाद्याचं आयुष्य घडवण्यासारखं दुसरं कोणतंही पुण्य या जगात असू शकत नाही.

**बोध**

# महासागर कर्मयोगी पुरस्कार














# एचएसआरपी नंबर प्लेट गुजरातपेक्षा महाराष्ट्रात महाग का?



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :**
देशभरात २०१९ पूर्वी निर्मित सर्व वाहनांमध्ये हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट (एचएसआरपी) बंधनकारक करण्यात आले आहे. राज्यातही नंबर प्लेट बदलवले जात आहेत.

मात्र गुजरात, आंध्रप्रदेशसारख्या इतर शेजारी राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात सर्वाधिक दर का आहेत, असा प्रश्न उपस्थित करणारी जनहित याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात दाखल करण्यात आली. उच्च न्यायालयाने राज्य परिवहन आयुक्तांना तीन आठवड्यात जबाब नोंदवण्याचे आदेश दिले.

सुदर्शन बागडे यांनी ही याचिका दाखल केली आहे. याचिकेवर न्या. नितीन सांबरे आणि न्या. वृषाली जोशी यांच्या खंडपीठासमक्ष सुनावणी झाली. याचिकेनुसार, देशासह संपूर्ण राज्यात एचएसआरपी प्लेट लावण्यात येत आहे. याचा आर्थिक भार वाहनचालकांवर बसत आहे.

२०१८ साली सर्वोच्च न्यायालयाने एचएसआरपीबाबत निर्णय देताना स्पष्ट केले होते की, वाहनांमध्ये वापरण्यात येणाऱ्या इंधनाचे वर्गीकरण करण्यासाठी विविध रंगांचे होलोग्राम स्टिकर्स लावावे. यामागे रस्ते सुरक्षा, वाहतूक नियमांची अंमलबजावणी करणे हा उद्देश होता. सर्वोच्च न्यायालयाने निर्णय देताना नंबर प्लेटच्या दरांबाबत काहीही सांगितले नव्हते. त्यामुळे देशातील राज्यांमध्ये वेगवेगळ्या दर आकारण्यात येत आहेत.

## उच्च न्यायालयात प्रश्न

महाराष्ट्रात सर्वाधिक वाहनसंख्या आहे, मात्र तरीही सर्वाधिक दर आकारला जात आहे. याचा भुर्दंड नागरिकांना बसत आहे. त्यामुळे राज्यात मुबलक दरात एचएसआरपी प्लेट उपलब्ध होईपर्यंत यावर बंदी घालण्यात यावी, सर्व भागात समान दर असावे, अशी मागणी याचिकाकर्त्यार्ने केली आहे. याचिकेवर पुढील सुनावणी २५ एप्रिल रोजी होईल.

महाराष्ट्राच्या शेजारील गुजरात, आंध्रप्रदेश, गोवा या राज्यात एचएसआरपी प्लेटचे दर कमी आहेत. मात्र महाराष्ट्रात ते सर्वाधिक आहेत, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. कमी दरात ही सुविधा उपलब्ध करून देणे इतर राज्यांना शक्य आहे तर महाराष्ट्राला का नाही, अशी मौखिक विचारणा करत न्यायालयाने परिवहन आयुक्तांना जबाब नोंदवण्याचे आदेश दिले.

महाराष्ट्रामध्ये एचएसआरपी बसवण्यासाठीची अंतिम मुदत ३१ मार्च २०२५ होती, जी आता पुन्हा वाढून ३० जून २०२५ पर्यंत झाली आहे. राज्यात १ एप्रिल २०१९ पूर्वी खरेदी केलेल्या वाहनांवर या नंबरप्लेट नाहीत. त्यामुळे दिलेल्या मुदतीत त्यांना ही प्रक्रिया पूर्ण करावी लागेल, अन्यथा नियमानुसार दंड आकारण्यात येणार असल्याचा इशारा परिवहन खात्याने दिला आहे. दरम्यान, या नव्या आदेशाने अनेक वाहनधारकांमध्ये कमालीचा असंतोष पसरल्याचे दिसून येते.

# तांदळाची भेसळ करणाऱ्यांवर कठोर कारवाई करा

## खासदार डॉ. नामदेव किरसान यांची संसदेत मागणी

■ **महासागर प्रतिनिधी गडचिरोली, दि. ५ :**



राईस मिलमध्ये घोटाळा करून तांदळाची मिलावट करणाऱ्यावर कडक कारवाई करावी, अशी मागणी गडचिरोली-चिमूर लोकसभा क्षेत्राचे खासदार डॉ. नामदेव किरसान यांनी संसदेत केली.

शासकीय धान खरेदी केंद्र व महामंडळातून ते धान्य जिल्ह्यातील मोठ्या राईस मिलमध्ये पिसाई करून ते तांदूळ शासकीय महामंडळाच्या माध्यमातून सरकारी स्वस्त धान्य दुकानात पोहचवायचा असतो. मात्र शासकीय धान खरेदी केंद्रातून प्राप्त होणाऱ्या धानापासून मिळणारे उच्च प्रतिचा तांदूळ राईस मिलमध्ये भरडाई झाल्यावर बरेच राईस मिलर्स बाहेर विकतात व त्या जागी अतिशय निकृष्ट दर्जाचे तांदूळ सरकारी महामंडळात जमा करतात.

त्यामुळे सरकारी स्वस्त धान्य दुकानात ते निकृष्ट दर्जाचे तांदूळ पोहचविल्या जाते, असा भ्रष्ट कारभार करणाऱ्या राईस मिलर्सची चौकशी करून कडक कारवाई करण्याची मागणी गडचिरोली - चिमूर लोकसभा क्षेत्राचे खासदार डॉ. नामदेव किरसान यांनी संसदेत केली.

# कृषीमंत्री असंवेदनशील

## वडेट्टीवार यांची टीका

■ **महासागर प्रतिनिधी चंद्रपूर, दि. ५ :**
राज्यात विदर्भ, मराठवाड्यात अवकाळी पावसाने शेतकऱ्यांना फटका बसला आहे. तूर, द्राक्ष, कांदा, भाजीपाला अशा पिकांचे नुकसान झाले आहे. अशा वेळी शेतकऱ्यांना दिलासा देण्याऐवजी कृषीमंत्र्यांची भाषा ही असंवेदनशील असल्याची टीका काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली.

हाताशी आलेले पिक गेल्याने बळीराजा अडचणीत असताना त्यांना समजून घेण्याऐवजी महायुतीच्या मंत्र्यांची भाषा अरेरावीची आहे. बहुमत मिळाल्याने कोणी आमचे वाकडे करू शकणार नाही असेच या मंत्र्यांना वाटत असल्याने शेतकऱ्यांना सरकारने वाऱ्यावर सोडलं आहे अशी टीका वडेट्टीवार यांनी माध्यमांशी बोलताना केली .

# आयपीएल सट्टेबाजांवर धाडी

## दोन घटनात ११ आरोपी गजाआड, लाखोचा माल जप्त

■ **महासागर प्रतिनिधी भंडारा, दि. ५ :**
आयपीएल क्रिकेट स्पर्धेवर सट्टा व्यवसाय करणाऱ्यांवर भंडारा आणि तुमसर पोलिसांनी जोरदार कारवाई केली आहे. स्थानिक गुन्हे शाखेने आयपीएल क्रिकेट सट्टा जुगाराचा पदार्फाश केला. पोलिसांनी खरबी येथे क्रिकेट सट्टा खेळताना आरोपीला रंगेहाथ पकडले. यावेळी आरोपीच्या ताब्यातून ६३ हजार ७१५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पथकाला गोपनीय माहिती मिळाली की, खरबी येथे आयपीएल सामन्यांवर ऑनलाइन सट्टा सुरू आहे. या माहितीच्या आधारावर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मौजा खरबी येथील अजय गोस्वामी यांच्या घरी जाऊन झडती घेतली. यावेळी आशिष गिरेपुंजे नावाचा व्यक्ती आयपीएलच्या थेट प्रक्षेपणावर मोबाईलद्वारे क्रिकेट सट्टा खेळत असताना पकडला गेला. त्याच्याकडून तीन मोबाईल (मुल्य ३६,०००), २,१६० रुपये रोख रक्कम, एक मोटारसायकल (किंमत ५५,००० रुपये), कॅल्कुलेटर (किंमत ५०० रुपये) आणि इतर साहित्य असा एकूण ६३,७१५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलिसांनी आरोपीची विचारपूस केली असता, तो मनोज प्रकाश नवखरे (रा. सुभाष वार्ड, गणेशपूर) याच्यासाठी काम करत असल्याचे त्याने सांगितले. पोलिसांनी पंचनामा करून मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी आशिष प्रेमजी गिरेपुंजे (वय ३३रा. खरबी, ता.जि.भंडारा) आणि मनोज प्रकाश नवखरे (रा. सुभाष वार्ड गणेशपुर, ता. जि. भंडारा) या दोघांविरोधात जवाहर पोलिस ठाण्यात महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम सहकलम ४६ भारतीय न्याय सहिंता अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदरची कारवाई पोलिस अधीक्षक भंडारा, अपर पोलिस अधीक्षक भंडारा यांच्या मार्गदर्शनात पोलिस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा नितीन चिंचोळकर, सहायक पोलिस निरीक्षक केशव पुंजरवाड, हवालदार नितिन महाजन, प्रफुल कठाणे, शिपाई मंगेश मालोदे यांनी केली. पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक केशव पुंजरवाड करीत आहेत.

आणखी एका घटनेत तुमसर पोलिसांनी शहरात वेगवेगळ्या ठिकाणी सुरु असलेल्या आयपीएल सट्टा बाजारांवर धाड घालुन आरोपींवर गुन्हे दाखल करुन अटक केली आहे. दोन वेगवेगळ्या ठिकाणी एकाच रात्री केलेल्या धाडीत ९ आरोपींविरुद्ध दोन गुन्हे दाखल करण्यात आले असून, पोलिसांनी ६ अँड्रॉइड मोबाईलसह ७४,००२ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला .

पोलिस निरीक्षक संजय गायकवाड, पो.नि. मिलिंद तायडे, पोउपनि प्रविण सयाम आणि पोउपनि धर्मेंद्र बोरकर हे तुमसर पोलीस ठाण्यात असताना त्यांना गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीवरून गॅलेक्सी बारजवळ आणि मालवीय वार्ड येथे सट्टेबाजांवर धाड टाकण्यात आली.

रात्री पोउपनि धर्मेंद्र बोरकर यांच्या नेतृत्वाखालील पथकाने कोलकाता नाईट रायडर्स विरुद्ध सनरायझर्स हैदराबाद सामन्यावर सुरू असलेल्या सट्टयावर धाड टाकली. या ठिकाणी योगेश रमेश तिजारे (३२) आणि विवेक उर्फ विक्की रविशंकर कौशल (२७) या दोन आरोपींना अटक करण्यात आली.

तपासात उघड झाले की हे आरोपी योगेश श्रीधर चकोले, सोनू अग्रवाल, संजय हंसराज साठवने आणि धीरज बालपांडे यांच्या सांगण्यावरून सट्टा चालवत होते. याप्रकरणी अप. क्र. १८४/२०२५ अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

रात्री पोउपनि प्रविण सयाम यांच्या पथकाने मालवीय वार्ड येथे दुसरी कारवाई करत सुरेश दामोदर चकोले याला मोबाईलवरून सट्टा खेळताना रंगेहाथ पकडले. तपासात त्याच्यासोबत शुभम दामोदर चकोले आणि संजय साठवने यांचाही सहभाग असल्याचे निष्पन्न झाले.

या प्रकरणी अप. क्र. १८३/२०२५ नोंद करण्यात आला आहे.या दोन्ही कारवायांमध्ये एकूण ६ अँड्रॉइड मोबाईल आणि सट्ट्याचे रेकॉर्डसह ७४००२ रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. काही आरोपी अद्याप फरार असून, त्यांच्या अटकेसाठी पोलीस अधिक तपास करत आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक नुरुल हसन, अप्पर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे, उपविभागीय अधिकारी गोफणे, पो.नि. संजय गायकवाड व पो.नि. मिलिंद तायडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पुढील तपास पोउपनि प्रविण सयाम, पोउपनि धर्मेंद्र बोरकर तसेच पो. हवा. कनोजीया, पो.शि. नितीन झंझाड, पो.शि. काचगुंडे, पो. गिरीपुंजे आणि पो.शि. मुलकलवार करत आहेत.

आयपीएल क्रिकेट स्पर्धेवर जुगार लावण्याचे प्रमाण सर्वत्र वाढले असून, पोलीस अशा आरोपींचा कटाक्षाने शोध घेत आहेत.

# ४० किलो गांजासह पाच जण अटकेत

■ **महासागर प्रतिनिधी अमरावती, दि. ५ :**
कारमधून गांजा तस्करी करणाऱ्या पाच जणांना गुन्हे शाखेच्या युनिट २ ने अटक केली. या कारवाईत ४०.३५ किलो गांजा, कार, मोबाइल व रोख असा एकूण १३ लाख ५२ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये तीन तरुणींचा समावेश आहे. ही कारवाई शुक्रवारी दुपारी नांदगाव पेठ ठाण्याच्या हद्दीतील वाळकी मार्गावर करण्यात आली.

सै. रशीद सै. जमशिद (३५), अरफाक दानिश शब्बीर पटेल (२३, दोघेही रा. जुनी वस्ती, बडनेरा) या दोघांसह १९ ते २२ वयोगटातील तीन तरुणींना अटक करण्यात आली. नांदगाव पेठ टोल नाक्याकडून वाळकी गावाकडे कारमधून दोन पुरुष व तीन महिला गांजाची तस्करी करत असल्याची माहिती गस्तीवर असलेल्या गुन्हे शाखेच्या युनिट दोनला मिळाली. या माहितीच्या आधारावर वाळकी मार्गावर नाकाबंदी करून ही कार थांबवण्यात आली. कारची झडती घेतल्यावर त्यात ४०.३५ किलो गांजा आढळून आला. त्यानुसार गुन्हे शाखेच्या युनिट दोनने पाचही आरोपींना अटक केली.

# द मीडिया फाउंडेशनतर्फे माजी खा. डॉ. अशोक नेते यांचा सत्कार

■ **महासागर प्रतिनिधी, गडचिरोली, दि. ५ :**
द मीडिया फाऊंडेशनतर्फे राष्ट्रीय पत्रकारिता उत्कृष्टता पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. हा सोहळा हॉटेल लँडमार्क, गडचिरोली येथे पार पडला. या सोहळ्यात राजकीय व सामाजिक क्षेत्रातील योगदान तसेच डॉक्टरेट पदवी मिळविल्याबद्दल माजी खासदार डॉ. अशोक नेते यांचा गौरव चिन्ह, शाल व श्रीफळ देवून विशेष सत्कार करण्यात आला.



कार्यक्रमाची सुरुवात जय जय महाराष्ट्र माझा या गौरवगीताने झाली. प्रमुख अतिथी डॉ. अशोक नेते यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमास पद्मश्री डॉ. परशुराम खुणे, सिनेट अध्यक्षा तनुश्री आत्राम, मानवाधिकार संघटनेचे प्रदेशाध्यक्ष तथा भाजपा जिल्हा उपाध्यक्ष डॉ. प्रणय खुणे, अभियंता साखरवाडे, जयंतजी चौधरी, त्रिपाठी, द्याद मिडिया फाऊंडेशन संस्थापक ब्रम्हानंद तिवारी, मानवाधिकार संघटनेचे प्रवक्ता ज्ञानेंद्रजी विशवास, भाजपा जिल्हा महामंत्री प्रकाश गेडाम, जिल्हा उपाध्यक्ष डॉ. भारत खटी, जिल्हा उपाध्यक्ष अरुण हरडे यांसारखे विविध क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी माजी खा. डॉ. अशोक नेते म्हणाले, पत्रकारिता हा लोकशाहीचा चौथा स्तंभ असून सामाजिक, राजकीय व शैक्षणिक घडामोडींचे सत्य जनतेपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करते. निःपक्षपाती आणि सत्यनिष्ठ पत्रकारितेचा आदर्श ठेवणे गरजेचे आहे. यासोबतच विविध क्षेत्रात काम करणाऱ्या उल्लेखनीय व्यक्तींचा या ठिकाणी सत्कार करण्यात आला. चांगला कार्यक्रम आयोजित केला त्याबद्दल या कार्यक्रमाला धन्यवाद देतो, असे ते म्हणाले. यावेळी जिल्हाभरातील पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रायपूरची सौरक्रांती : वर्धा जिल्ह्याचे नवे 'हरित' गाव!





■ **महासागर प्रतिनिधी वर्धा, दि. ५ :**
जिल्ह्यातील रायपूर गावाने सौर ऊर्जेच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. देवळी तालुक्यातील या गावाने १०० टक्के सौर ऊर्जेचा वापर करून जिल्ह्यातील तिसरे सौरग्राम होण्याचा मान मिळवला आहे. महावितरणच्या नागपूर परिमंडलांतर्गत चिचघाट राठी आणि नेरी (पुनर्वसन) पाठोपाठ या सौरग्रामच्या यादीत रायपूरचे नाव आता जोडले गेले आहे.

गावातील १८ घरगुती आणि १ पथदिव्याच्या वीज जोडण्या आता पूर्णपणे सौर ऊर्जेवर चालणार आहेत, ज्यामुळे गावकऱ्यांचे वीज बिल शून्यावर येणार आहे. पंतप्रधान सूर्य घर मोफत वीज योजनेचा लाभ घेत १६ घरांच्या छतावर प्रत्येकी २ किलोवॅटचे स्वतंत्र सौर प्रकल्प बसविण्यात आले आहेत. तसेच, एका घरावर १ किलोवॅटचा प्रकल्प आणि पथदिव्यांसाठी १ किलोवॅट क्षमतेची विनाअनुदानित सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला आहे. या प्रकल्पांमधून दरमहा सरासरी ५१०० युनिट सौर ऊर्जा निर्मिती होणार आहे.

रायपूरला १०० टक्के सौर गाव बनवण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महावितरणचे अध्यक्ष लोकेश चंद्रा, संचालक (संचालन) अरविंद भादीकर, संचालक (प्रकल्प) प्रसाद रेशमे यांच्या मार्गदर्शनात प्रादेशिक संचालक परेश भागवत, कार्यकारी संचालक (विशेष प्रकल्प) धनंजय औंढेकर, नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता दिलीप दोडके आणि वर्धा मंडलाच्या अधीक्षक अभियंता स्मिता पारखी यांच्या मार्गदर्शनाखाली वर्धा विभागाचे कार्यकारी अभियंता स्वप्नील गोतमारे, कार्यकारी अभियंता (प्रशासन) प्रदिप घोरुडे, देवळी उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता प्रेम तेलरांधे, सहाय्यक अभियंता मयूर हेडाऊ आणि जनमित्र संतोष आत्राम यांनी अथक परिश्रम घेतले.

या सौर ऊर्जा प्रकल्पांमुळे रायपूर गावातील नागरिकांना केवळ आर्थिक फायदा होणार नाही, तर पर्यावरण संवर्धनातही रायपूरचे योगदान महत्त्वाचे ठरणार आहे.